भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे

# संपर्क

संपर्कात राहु या ! संपर्क वाढवू या !!



कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने कऱ्हाडे ज्ञाती बांधवांसाठी
चालविलेले नियतकालिक (खाजगी वितरणासाठी)

वर्ष ११ वे | एप्रिल – जून २०१५ | अंक १ ला


**अध्यक्षः श्री. आनंद पराडकर** **मो.नं ९३२६८२६८८४**

**सचिवः श्री. गोपाळ भाटवडेकर** **मो.नं ९८५०९७९७०६**

**कोषाध्यक्षः श्री. चंद्रशेखर जोशी** **मो.नं ९४४९०५१६५३**

संपादक मंडळ

**मुख्य संपादक :**
**श्री. गणेश गुर्जर**
पुणे, ९८९०९९०११३
**श्री. श्रीगजानन गुर्जर**
पुणे, ९९७०१७४८१८
**श्री. मकरंद फणसळकर**
पुणे, ९८२२६१७३२४

**शहर प्रतिनिधी :**
श्री. दिलीप धोपेश्वरकर, मुंबई, ९८२०५२१०९८
श्री. चंद्रशेखर जोशी, बेळगांव, ९४४९०५१६५३
श्रीमती स्वाती प्रभुदेसाई, डोंबिवली, ९७६९३२९९९३
श्री. अविनाश जावडेकर, नागपूर, ९८६०२५७३१५
सौ. अंजली माईणकर, सोलापूर, ८८८८२२१७४६
सौ. मानसी मोघे, सातारा, ०२१६२–२३३६४३
श्री. सुनिल जठार, रत्नागिरी/राजापूर, ९२७०५७९४००
श्री मिलिंद पावनगडकर, कोल्हापूर, ९२२५८००५८७
श्री. जयंत लघाटे, मुलुंड, ९९६९०३७३४१
श्री. हेमंत पुराणिक, पुणे, ९९२३८१०१९४
श्री. नरेंद्र पानवलकर, बडोदा, ९२२७१३५७९४
श्री. शरद खांडेकर, सांगली, ९८२२९९५८९२
श्री. चंद्रशेखर आठल्ये, ठाणे, ९८६९६७४९५८
सौ. सुप्रिया फणसळकर, नाशिक, ९४०३१४८७७५
श्री. विनायक उमर्ये,आजगांव,जि. सिंधुदूर्ग, ९४२३८८०१३८


**ऑफिस संपर्क : ८१४९९०७७८९**
email : bkbmsindia@gmail.com


**भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे संपर्क हे त्रैमासिक मालक, भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ (ट्रस्ट) यांचेसाठी मुद्रक व प्रकाशक गोपाळ भाटवडेकर यांनी एकविरा प्रकाशन, कर्वेनगर, पुणे येथे छापून ४३७, नारायण पेठ, अनिश प्रसाद अपार्टमेंट, पुणे ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक – गणेश गुर्जर**


## आवाहन

'संपर्क'च्या सर्व वर्गणीदारांस या द्वारे आवाहन करण्यात येते की आपली वार्षिक वर्गणी रू. १००/– (रूपये शंभर मात्र) आपल्या शहर प्रतिनिधींकडे जमा करावी. शहर प्रतिनिधींकडे प्रत्येक सभासदाची वर्गणी कोणत्या महिन्यापासून येणे आहे, त्याच्या याद्या पाठवल्या आहेत. त्यानुसार शहर प्रतिनिधींशी संपर्क करून वर्गणी जमा करावी. शहर प्रतिनिधींनी जमा झालेली वर्गणी आपल्या नजिकच्या बँक ऑफ इंडियाच्या शाखेत भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाच्या खाते क्रमांक ०५०५११०११०००९४१० वर लक्ष्मीरोड, पुणे शाखेमध्ये जमा करून यादी आणि जमा पावती पुणे कार्यालयाकडे पाठवावी. बँक ऑफ इंडिया, IFSC Code BKID0000505 कोणत्याही अंकापासून वर्गणीदार होता येते. किरकोळ अंक विक्री नाही.

**संपादक**
**– गणेश गुर्जर**

## जाहिरातीचे दर

| पान | एकवेळ | चारवेळा |
|---|---|---|
| पाव | ४००/– | १५००/– |
| अर्धा | ८००/– | ३०००/– |
| पूर्ण | १६००/– | ६०००/– |
| शुभेच्छा | २५०/– | १०००/– |
| पुर्ण पान रंगीत | २५००/– | १००००/– |

**नियतकालिकाचे नाव** : भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे'संपर्क'
**पत्ता** : भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ,
**द्वारा :** कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ,
'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ,
पुणे – ४११ ०३०
**संपादक** : श्री. गणेश गुर्जर
**मुद्रक** : एकविरा प्रकाशन आणि प्रसिद्धी सेवा,
स.नं.१/२७ व २९, माऊली सोसायटी, अपर्णा हाऊस समोर,
विठ्ठल मंदिरामागे, कर्वेनगर, पुणे – ४११ ०५२.

संपर्क

# अनुक्रम


| | |
|---|---|
| ४ | बकुळफुले - पर्यटन |
| ५ | पर्यावरण |
| ७ | कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ डोंबिवली येथे संक्रांत संमेलन सोहळा संपन्न |
| ८ | व्यक्तीपरिचय - गायनाचार्य गणेश रावजी - पाध्येबुवा |
| ११ | व्यक्तीपरिचय - डॉ. गोपाळ सदाशिव पळसुले |
| १३ | याला जीवन ऐसे नाव |
| १४ | कऱ्हाडे ब्राह्मण संघ, कोल्हापूर येथे विविध गुणदर्शन कार्यक्रम उत्साहात संपन्न |
| १५ | वधू-वर सूची |
| २१ | ''मराठीतील सदाबहार गीते'' |
| २३ | पाककृती |
| २३ | कऱ्हाडे ब्राह्मण संघ, बेळगाव येथील महिला दिनाच्या कार्यक्रमातील सौ. निर्मला पित्रे यांच्या कानडी भाषणाचा मराठी अनुवाद |
| २६ | माझी आनंद यात्रा |
| २७ | गाऊ त्यांची आरती |
| २८ | संस्था वृत्त |
| २९ | 'आठवणींची लाख फुले' |
| 30 | कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे येथे तिळगूळ समारंभ संपन्न |


सदर नियतकालिकातील मजकूराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. **- संपादक**

संपर्क



## हितगुज

सर्वप्रथम संपर्कचे सर्व सभासद, वाचक, हितचिंतक, जाहिरातदार, भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे सर्व सभासद आणि त्यांचे पदाधिकारी व सर्व संघांचे सर्व सभासद, प्रिंटर्स यांना "हिंदु नववर्षाच्या" हार्दिक शुभेच्छा

मागील अंकामध्ये महासंघ २५ व्या वर्षात तर "संपर्क" २१ व्या वर्षात १ एप्रिल २०१५ रोजी केले आहे. हा एक दुग्धशर्करा योगच आहे याची नोंद केली होती. याच संदर्भात "संपर्क" च्या पहिल्या वार्षिक अंकाची आठवण झाली म्हणून डोंबिवली संघास विनंती करून पहिल्या व दुसऱ्या वार्षिक अंकाच्या प्रति मागवल्या.

हे दोन्ही अंक वाचले. हस्तलिखीत अंक असल्यामुळे मनात एक कल्पना सुचली की या दहाव्या वर्षाच्या निमित्ताने वर्ष १५-१६ च्या अंकातील "हितगुज" (संपादकीय) तरी किमान हस्तलिखीत असावे आणि म्हणून एप्रिल १५ ते जाने १६ या अंकातील "हितगुज" (संपादकीय) हे हस्तलिखीत असेल.

पुण्याच्या संघाने "संपर्क" ची जबाबदारी स्विकारली ती काही तरी नवनवीन बदल करून अंक समृद्ध करणे आपण याचा निश्चितच अनुभव घेत असाल. मा. अध्यक्ष श्री आनंद फराटकर, मा. श्री गोपाळ भारवडेकर कार्यवाह मा. श्री चंद्रशेखर जोशी खजिनदार यांच्या समवेत एप्रिल १५ च्या अंकाचे प्रकाशनाचे वेळी जो विचार माझ्या मनात आला तो मी मांडला की महाराष्ट्र बाहेरील संघांमध्ये बेळगांव, बंगळूरू, बडोदा, आगलपाडी, मंगळूरू, हुबळी असे संघ आहेत तर त्यांच्याकडील कार्यक्रमाचे इतिवृत्त त्यांच्या भाषेत आले तर सोबत मराठी अनुवाद मिळाला तर या भागातील अन्य कऱ्हाडेच नव्हेतर अन्य नागरिकसुद्धा आकर्षित होतील. आज २० व्या वर्षाच्या सुरुवातीला या कल्पनेस मूर्त स्वरूप आले आहे. बेळगांव संघाला विनंती करून सौ. जिते यांचे महिला दिनानिमित्ताचे भाषण कानडीतून कळवले त्याचा मराठी अनुवाद कु. संपदा कुलकर्णी (इ. १० वी) हिने करून दिला ते भाषण व अनुवाद या अंकात समोरासमोर छापला आहे.

यामागील हेतू हाच की जरी भाषा वेगळ्या असल्या तरी ब्राह्मण मात्र एकच म्हणजे एकोप्याची आहे. धन्यवाद.

संपादक

# ‘बकुळफुले’


डॉ. श्रीकृष्ण जोशी
रत्नागिरी

वेरूळची लेणी पाहत असताना, शिल्पकला, वास्तुकला यांचं मनोज्ञ दर्शन घ्यायचं असतं. तिथं असणाऱ्या मूर्तींच्या शेजारी वा मूर्तीच्या अंगावर बसून फोटो काढून घ्यायचे नसतात. असं करणं म्हणजे कलाकारानं निर्माण केलेल्या कलेचा तो अपमान असतो. भावना आणि श्रद्धा दुखावल्या जाण्याची भितींही असते. अनेक ठिकाणी वृक्षांवर बदामाचा आकार कोरून तिथं नावं लिहिण्याची आणि वृक्ष खराब करण्याची वाईट प्रवृत्तीसुद्धा अलिकडे दिसते.

## पर्यटन

पर्यटन म्हणजे काय असा प्रश्न विचारला तर अवतीभवती असणाऱ्याचे चेहरे पाहण्यासारखे होतील. अजून पर्यटन म्हणजे काय ते माहीत नाही? कम्माल आहे बुवा! असा भाव त्यांच्या चेहऱ्यावर असेल आणि का असू नये? पर्यटन म्हणजे काय हा काय विचारण्यासारखा प्रश्न झाला? पर्यटन म्हणून इथून तिथे जाणे काहीतरी पाहणे, राहणे, खाणे, फोटो ग्राफी करणे, डोंगर, किल्ले चढणे उतरणे, तलाव समुद्र यात डुंबणे किंवा फेरीबोटीतून फिरणे. वन्य पशू पक्षी पाहणे, सूर्योदय सूर्यास्तासारख्या सर्व परिचित घटना पाहणे. बस हे म्हणजे पर्यटन आपण पर्यटनासाठी जातो म्हणजे काय करतो त्याचं ढोबळ चित्र हे असं आहे.

प्रत्यक्षात पर्यटनात खूप काही वेगळ अभिप्रेत असतं. मुळात प्रवास, प्रवासी आणि प्रदेश हे तीन ‘प्र’कार कळणं गरजेचं असतं. हे तीन ‘प्र’कार परस्परावलंबी आहते. म्हणजे प्रदेश पहायचा असेल तर प्रवास केल्याशिवाय, प्रवाशाला तो दिसणार नाही. इतके ते एकमेकावर अवलंबून असतात. यातला एक जरी घटक बाजूला काढला तरी पर्यटन अस्तित्वात येणार नाही. प्रदेश पाहण्यासाठी प्रवाशाला प्रवास हे माध्यम असतं. प्रवास करणारी व्यक्ती, व्यक्ती म्हणून न राहता ती ‘प्रवासी’ या वेगळ्या भूमिकेत शिरते. फोटो, ऐकीव माहिती किंवा इंटरनेटवरून पाहिलेल्या प्रदेशाचे व्हिडिओज हे प्रदेशाची प्रत्यक्ष ओळख करून देत नाहीत. केवळ दृश्य माध्यमातून पाहिलेल्या वा श्राव्य माध्यमातून ऐकलेल्या त्या ध्वनिचित्रफिती असतात. याचाच अर्थ प्रदेश सुद्धा प्रवास करून येणाऱ्या प्रवाशाची वाट पहात असतो. एखाद्या उदाहरणातून हे लक्षात येईल. समुद्राच्या किनाऱ्यावर अनवाणी फिरल्यानं वाळूचा होणारा सुखद स्पर्श ध्वनिचित्रफितीतून अनुभवू शकत नाही. त्यासाठी किनाऱ्यावर जाऊन हिंडावं लागतं. माहित नसलेल्या रानफुलांचा गंध प्रत्यक्ष अनुभवल्यावरच मिळतो. पर्वतांची उंची, किल्ल्यांचा इतिहास, नद्यांचे वाहणे हे सगळं प्रत्यक्ष पाहण्यातच मजा आहे. तेव्हाच पर्ययन हा शब्द सार्थकी लागतो.



पर्यटनातल्या प्रवाशाचे वर्तन हा खरं तर चिकित्सेचाच भाग आहे. प्रवाशाच्या वर्तनावर पर्यटनाचं यश अवलंबून असतं आणि प्रवाशाचा पर्यटनातला आनंद सुद्धा.

रोजच्या धकाधकीच्या जीवनातून थोडं बाजूला होऊन नेहमीच्या भूमिका विसरून आपण पर्यटनासाठी बाहेर पडतो. कारण आपल्याला आनंद मिळवायचा असतो. उर्जा मिळवायची असते. अशा वेळी थोडी उन्मनी अवस्था असते. आपण मोकळे असतो. जिथं जातो तिथं आपल्याला कुणी ओळखणारं नसतं. त्यामुळं असेल कदाचित पण आपण स्वातंत्र्य उपभोगत असतो. या स्वातंत्र्याला स्वैराचाराची भीती असते. ‘मनःपूतं समाचरेत’ असं म्हणून चालत नाही. त्या त्या ठिकाणचे काही नियम असतात. काही सूचना असतात. त्यांचं पालन करणं हे गरजेचं असतं. नियम सूचना या केवळ त्या ठिकाणचं पावित्र्य, अस्तित्व टिकवण्यासाठी असतात. आपल्या पर्यटनाच्या स्वातंत्र्यांवर बंधन म्हणून त्या नसतात. फुलांना हात लावू नये, फुले तोडू नयेत. फोटो काढू नयेत. वास्तू वा वृक्षसंपदेवर स्वतःची नावं घालू नयेत वा कोरू नयेत. या आणि अशासारख्या सूचना या आपल्याला अडविण्यासाठी किंवा खिजविण्यासाठी नसतात. पुरातन वस्तूंचं आणि वास्तुंचं पावित्र्य आपल्या वर्तनातूनच अबाधित राहत असतं. हे लक्षात घ्यावं लागतं.

वेरूळची लेणी पाहत असताना, शिल्पकला, वास्तुकला यांचं मनोज्ञ दर्शन घ्यायचं असतं. तिथं असणाऱ्या मूर्तींच्या शेजारी वा मूर्तीच्या अंगावर बसून फोटो काढून घ्यायचे नसतात. असं करणं म्हणजे कलाकारानं निर्माण केलेल्या कलेचा तो अपमान असतो. भावना आणि श्रद्धा दुखावल्या जाण्याची भितीही असते. अनेक ठिकाणी वृक्षांवर बदामाचा आकार कोरून तिथं नावं लिहिण्याची आणि वृक्ष खराब करण्याची वाईट प्रवृत्तीसुद्धा अलिकडे दिसते.

सार्वजनिक जागेतील वृक्ष, किल्ले यावर नावं कोरून आपलं कर्तृत्व सिद्ध होत नाही. उलट ऐतिहासिक वारशाचा तो उपमर्द असतो. म्हणून पर्यटन करणाऱ्या प्रवाशानं मनावर नियंत्रण ठेवून केवळ नाविन्याचं दर्शन, परंपरांचं, संस्कृतीचं दर्शन एवढा मर्यादित हेतू ठेवला तर ‘प्र’कारातला प्रवासी पर्यटनाचा निखळ आनंद नक्कीच घेऊ शकेल.

# पर्यावरण



**मागील अंकात आपण ''पर्यावरण महर्षी'' ''श्री गुरुदेवदत्त''यांनी पर्यावरणातील २० घटकांना स्वत:चे गुरुस्थानी स्थान दिले आहे. यातील पहिला घटक ''पृथ्वी'' हा पहिला गुरु त्याबद्दलची माहिती घेऊ.**

पृथ्वीची उत्पत्ती साधारणत: ४.५० कोटी वर्षापूर्वी झाली असे म्हणतात. प्रथमत: थंड, विविध द्रव्याने तिची निर्मिती झाली. पण नंतर सूर्यप्रकाश, रासायनिक प्रक्रिया, उल्कापात, किरणोत्सर्गी द्रव्ये यामुळे तिची प्रकृती उष्ण झाली. नंतर अनेक वर्षांनी ती परत थंड झाली. तिचे पृष्ठभागावरील आवरण घन झाले. त्याचे पुढे भूकवच प्राप्त झाले. भूरासायनिक घटकामुळे ज्वालामुखी उद्रेकही प्रचंड झाले, त्यामध्ये कर्बवायू(कार्बनडाय ऑक्साईड) चे प्रमाण इतर वायूंचे पेक्षा जास्त होते. त्याचे आवरण तयार झाले. उष्णतेने पाण्याची प्रचंड प्रमाणात वाफ पृथ्वीभोवती निर्माण झाली आणि प्रचंड महावृष्टी होऊन सखोल भागात महासागर निर्माण झाले. हवेतील नायट्रोजन, कार्बनडाय ऑक्साईड पाण्यात मिसळल्यामुळे त्यामधून ॲमिनो ॲसिडस् व सूर्यऊर्जा प्रक्रियेतून अनेक जीवांची निर्मिती झाली. त्या सर्व प्रक्रियेला ३.५ कोटी वर्षे लागली. त्या पुढील जीवनालेख पुढील प्रमाणे –

५०० लाख वर्षापूर्वी – कवचधारी प्राणी निर्माण झाले.
३५० लाख वर्षापूर्वी – किटक निर्मिती झाली.
३०० लाख वर्षापूर्वी – कोळसा निर्मिती झाली
२०० लाख वर्षापूर्वी – महाकाय प्राणी डायनासोरचे आगमन
१९० लाख वर्षापूर्वी – भूखंड विभाजन सुरू झाले
१३० लाख वर्षापूर्वी – फुले देणारी वृक्षसंपदा निर्माण झाली
६५ लाख वर्षापूर्वी – डायनासोर अस्तंगत झाला.
६० लाख वर्षापूर्वी – खरी जंगले आणि वृक्ष संपदा निर्मिती झाली
३० लाख वर्षापूर्वी – मानवाची निर्मिती झाली
४० हजार वर्षापूर्वी– आताचा मानव उदयाला आला.
६ हजार वर्षापूर्वी – कथा, पुराणे वेद लिखित/ तोंडी स्वरुपांत मानवाला अवगत झाला.

साधारणत: इ.स.पूर्व ५००० ते ६००० काळी महापुरुष –भगवान श्रीकृष्णाने आपला प्रिय मित्र उद्धव यांस भगवान श्री दत्तात्रेय यांच्या जीवनावरची गाथा जी आज ''अवधूत गीता'' म्हणून ओळखली जाते, ती कथित केली, या अवधूत गीते मध्ये भगवान श्री दत्तात्र्यांचा परमभक्त व पट्टशिष्य झालेल्या यदु या राजपुत्राची एक सुंदर कथा आहे. त्यामध्ये भगवान श्री दत्तात्रेय यदूच्या प्रश्नांना उत्तरे देऊन यदूला गुरु उपदेश करतांना स्वत: विषयी विवेचन करतात. साधारणत: प्रत्येकाला एकच गुरु, पण भगवान श्री दत्तात्रेयांनी आपल्याला चोवीस गुरु आहेत हे सांगून यदूला आश्चर्यचकीत केले. श्री दत्तात्रेयांनी हे गुरु दैनंदिन पर्यावरण साखळीतून निर्माण केले जे महत्त्वाचे आहेत तर काही गुरु मानसशास्त्रावर आधारित आहेत.

पैकी ''पृथ्वी'' हा पहिला गुरु. त्यांचे निरीक्षणानुसार पृथ्वीवरील पशु, पक्षी, असंख्य जीव, जंतू, मानव, निसर्ग निर्मित पर्वत नद्या वृक्ष समुद्र इ ची जन्मदात्री पृथ्वीच आहे. पण या पृथ्वीला तिच्याच निर्मित जीवसृष्टीपासून सतत अपमान, कष्ट, त्यापासून निर्माण होणारी संकटे यांना निमूटपणे सहन करावे लागते. उदा. जनावरे, पशु, पक्षी, मानव क्षणाक्षणाला लाथाप्रहार करत असतात, त्यांच्या मलमूत्रांचाही त्रास सहन करावा लागतो. पीक पाण्यासाठी तिच्या पृष्ठभागाला जाळून चटके देत असतो. माणसांच्या लोभी स्वभावामुळे संपत्तीकरीता पर्वत, जमीन खणून काढत असतो ज्यामध्ये रत्ने, धातू यांचा समावेश असतो. निसर्गाच्या कोषातून भूकंप, ज्वालामुखी वादळे, अतिवृष्टी, पूर हे ही या पृथ्वीला सहन करावी लागतात.

एखादी माता आपल्या बाळाला पाजताना अवखळपणा, त्याचे मलमूत्र विसर्जन, तिला लाथा मारणे, चिमटा घेणे या सर्व क्रिया प्रेमळपणे सहन करत असते. त्याचप्रमाणे पृथ्वीसुद्धा आपल्यावर होणारे विविध आघात जे मानवनिर्मित आहेत ते सहन करून जीवांचे विविध अपराध पोटात घालते व त्यांचा आकस धरत नाही. अनेक त्रास भोग व इच्छा नसतांना स्वीकारावे लागणारे भोग हे दोष व स्तुती यांचा विचार न करता अपूर्व सहनशीलता, क्षमा करण्याची ताकद व शांतीची परिसीमा भगवान दत्तात्रेयांना भावली.

श्री भगवान दत्तात्रेयांना असेही आढळले की, पृथ्वीवरील वृक्ष ही सतत खडे उभे असतात, विश्रांतीसाठी कधीच आडवे होत नाहीत. त्यांच्यावर पक्षीसंपदा, किटके सरपटणारे प्राणी कायमची वस्ती करतात. पक्षी घरटी बांधतात. त्यांना वृक्ष प्रेमाने जवळ करतात. पाऊस, वादळे, भूकंप यांची तमा न बाळगता शीत, उष्ण, अशा ऋतुमध्ये इतरांना आसरा देतात पण आपण वर्षानुवर्षे त्रास सहन करतात. यांच्यापासून फुले, फळे, पाने यांची निर्मिती होते पण त्याचे शोषण मानव प्राणी वृक्षांना ओरबाडून त्यांना तोडून घरे बांधणे. त्या वृक्षकाटणीचे स्वत:च्या उपयोगासाठी ज्वलन करणे इ. क्रूर कर्मे करतात. पण वृक्षराज त्याची कधीच दखल घेत नाहीत. हे वृक्षराज सततपणे भूक, तहान विसरून आपली संपदा वाटतच रहातात.

पृथ्वीवरील पर्वतराजी सतत थंड पाणी झऱ्याच्या रुपात सर्व प्राणी मात्रांची तहान भागवत असतात. आपल्या गुहेमध्ये अनेक जीव जंतूंना मानवापासून संरक्षण मिळण्यासाठी आश्रय देणे. माणसे रत्नांसाठी, खनिजांसाठी, पेट्रोलजन्य पदार्थांसाठी पृथ्वीवर अनेक आघात करून खणून काढतात, असे असूनही पृथ्वीने अजून पर्यंत कोप केला नाही. उलट मानवाला आपल्या जवळील खजिना बहाल करतांना पूर्णपणे विरक्तता दाखवते हे सर्व दत्तात्रेयांनी जाणले.

पृथ्वी, त्यावरील वृक्ष संपदा, पर्वत यांचे पासून साधकाने काय स्वीकारावे. तर विरक्ती, क्षमाशील वृत्ती, प्रचंड सहनशीलता, प्रचंड इच्छाशक्ती, सढळ नि:स्वार्थी दानधर्म, सत्संगती, दयाबुद्धी, सुखदु:खांचा विचार न करता सतत कार्य करणे तसेच द्वेष वा स्तुतीचा विचार न करणे, कशाची ही खंत न बाळगणे, पृथ्वीप्रमाणे सतत आपली गती, कक्षा न सोडता राहणे एवढे गुण पृथ्वीकडून जाणून भगवान श्री दत्तात्रेयांनी आपला पहिला गुरु म्हणून पृथ्वीला मानले आहे. हीच सर्वांनी आपल्या पृथ्वीमाते कडून घेण्याची अपेक्षा दत्तगुरुंनी पर्यावरणासाठी म्हणून मानली आहे.

**– डॉ. प्रमोद प्र. मोघे**
**पर्यावरण तज्ज्ञ, मो. ९३२५३८००९३**

VIJAY DIWAKAR DHAVLE
MFA

CONCEPT PRINTS
THE DESIGN STUDIO

An Aesthetic Essence To Advertising

Domination in

- Pharmaceutical Product Promotional Printed Material, Visual-Aid, Literature, Folder, Brochure
- Packaging
- Conference Printed Material
- Publication

Cell : +91 9225219040 / 9225212384 / 9225852594
Email : vdhavle@rediffmail.com

Tilak Statue, Mahal, Nagpur - 440032

Plot 118, New Dnyaneshwar Nagar,Manewada Road, Nagpur - 440027

**सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा!**

# निलदिप केटरर्स

सौ. प्रज्ञा प्रकाश काणे
**दूरध्वनी : ०२५१–२४५२०५२**
**भ्रमणध्वनी : ९८१९३१२५६९**

शिवप्रतिमा मित्रमंडळ हॉल
डॉ. कामत हॉस्पिटल शेजारी, ममता हॉस्पिटलजवळ, निवासी विभाग, एम. आय. डी. सी., डोंबिवली (पू.)

# कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली येथे संक्रांत संमेलन सोहळा संपन्न

## संस्थावृत्त





कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ डोंबिवली, जि.ठाणे या सामाजिक संस्थेचा यावर्षीचा संक्रांत संमेलन सोहळा, रविवार दि.१८ जानेवारी २०१५ रोजी , संस्थेच्या समाजमंदिर सभागृहात अत्यंत उत्साहात व दिमाखात साजरा झाला.

प्रमुख पाहुणे म्हणून लोकसत्ताचे माजी उपसंपादक सन्माननीय श्री.सुधीर जोगळेकर उपस्थित होते. या सोहळ्यामध्ये विद्या निकेतन चे सर्वेसर्वा सन्माननीय श्री.विवेक विनायक पंडित सर आणि टिळकनगरमधील सन्माननीय श्री.सुहास दांडेकर यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच वेदचूडामणी श्री.रामचंद्र (वल्लभ) मुंडले याना रु.५,०००/- रोख,मानपत्र, शाल व श्रीफळ देऊन सन्मानीत करण्यात आले. त्याचप्रमाणे डोंबिवलीतील ज्ञाती बांधव सन्माननीय श्री दुर्गाराज जोशी यांचा संगीत क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल आणि सन्माननीय श्री.मिलिंद अधिकारी यांचा नाट्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल विशेष गौरव, व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. शालेय व महाविद्यालयीन परिक्षांमध्ये विशेष गुणवत्ता प्राप्त केलेल्या ज्ञातीतील विद्यार्थ्यांना पण या कार्यक्रमात गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. शुभांगी पुसाळकर व सौ. माधुरी येल्लापुरकर यानी केले. प्रमुख सत्कारमूर्ती श्री पंडित सर आणि वेदचूडामणी श्री.रामचंद्र (वल्लभ) मुंडले याना देण्यात आलेल्या सन्मानपत्राचे वाचन कु. गायत्री कशेळकर यानी आपल्या सुमधुर आवाजात केले. कु. गायत्री कशेळकर या रेडीओ FM² GOLD १००.७ या वाहिनी वर RADIO JOCKY चे काम करतात.

मध्यांतरानंतर डॉ.सच्चिदानंद सु.शेवडे यांचे ''भारत काल व आज'' या विषयावर व्याख्यान झाले. सस्नेह भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली. सभासदांचा प्रतिसादही उत्तम होता.

**ARUNDHATI KOPARKAR**
M.: 98811 57579

**AMOL KOPARKAR**
M.: 98222 95720

you dream it
we design it

**Our Services**

- Outdoor Catering Services
- Banquet Catering
- Other Banqueting Celebrations
- Corporate & Industrial Catering Services

**SHRIPAD NANIWADEKAR**
M.: 988220 32105

**SANJAY NANIWADEKAR**
M.: 98226 76293

**Our Services**

a. Traditional Catering
b. Other Traditional Fuctions
c. Marriage Halls Catering Services

**Regd. Office**
104, Mayuresh Apt.
Mayur Colony, Kothrud,
Pune - 411038.

## व्यक्तीपरिचय

# गायनाचार्य गणेश रावजी – पाध्येबुवा
## (एक प्रसिद्धी पराङ्मुख, तत्वनिष्ठ गानसाधक)

रत्नागिरी जिल्ह्यातील गोळवली हे एक छोटेसे खेडेगांव. रा स्व.सं. संघाचे पू. गोळवलकर गुरुजी यांचे हे मूळगाव. या गावातून अनेक गोळवलकर– पाध्ये घराणी शिक्षण, उपजीविका वगैरेसाठी देशावर विविध ठिकाणी स्थलांतरित झाली. गणेश रावजी पाध्येबुवा यांचे पूर्वज त्यापैकीच एक.

त्याकाळी गुणी जनांना संस्थानात आधार मिळत असे. त्यानुसार सातारा जिल्ह्यातील औंध या पंतप्रतिनिधींच्या राजधानीत कै. रावजी पाध्ये म्हणजे बुवांचे वडील दाखल झाले. तेथे किन्हईच्या यमाईदेवी मंदिरात देवीची पूजाअर्चा उपासना, पुराण सांगणे वगैरे धार्मिक विधी करून सुखाने संसार करू लागले. यथावकाश गणेशाची मुंज झाली. मात्र लगेचच रावजीबुवांचे निधन झाले आणि गणेशाच्या आयुष्याची परवड सुरू झाली.


शिक्षणासाठी पाध्ये बुवांना गोळवली जवळील देवरुख या तालुक्याच्या गावी नातलगांच्या आश्रयाने रहावे लागले. प्राथमिक शिक्षण संपताच ते साताऱ्याला संस्कृत शिक्षणासाठी आले. संस्कृत बरोबरच त्यांचा गाण्याकडेही कल होता. सातारा येथे पं. भास्करबुवा बखले यांचे गाणे ऐकावयास मिळाले. बुवांकडे चौकशी करून त्यांनी गाणे शिकण्याचे पक्के केले.

त्यानंतर गुजरातमधील नवसारी येथे ते गेले आणि संस्कृत बरोबरच फैज महंमद फत्तेमहंमद यांचेकडे गायनाचे धडे घेण्यास सुरुवात केली आणि बऱ्याच चिजा आत्मसात केल्या.

पुढे प्रथम बडोदा व नंतर धार येथे जाऊन ध्रुपद धमार चे शिक्षण पं. लालजी महाराज (अनंत रामचंद्र ढेकणे) यांचेकडून प्राप्त केले.

शिक्षण पूर्ण होतांच त्यांचा विवाह जमखंडी येथील रा. ब. सप्रे यांच्या कन्येशी संपन्न झाला. काही काळानंतर हैद्राबाद येथे गेले असतां पूज्य भटजीबापू महाराज यांनी त्यांना गानविद्या व पार्थिवपूजा यांची दीक्षा दिली. ती त्यांनी अखंड पाळली.

आतापावेतो बुवांनी ख्याल, ध्रुपद,



धमार, ठुमरी, टप्पा, अष्टपदी वगैरेत प्राविण्य प्राप्त केले होते. काही काळ ग्वाल्हेर येथे पं. गुणेबुवा यांचेकडे गानसाधना व बरोबरच सुगंधी द्रव्ये आयुर्वेदीय औषधे यांचे प्रशिक्षण घेऊन त्यांत ते मर्मज्ञही झाले. तथापि त्यांना एवढ्यावर समाधान मानून बसवेना.

पं. बखले बुवांच्या ओढीने ते पुण्यास आले व पर्वती संस्थानात राहून सेवा करू लागले. यावेळी त्यांना पंढरपूरकर बुवा, दिवटेबुवा, चिंतोबा गुरव यांची साथ लाभली.

संगीताच्या आवडीमुळे रसिकराज साहित्यसम्राट्‌अ न.चिं. केळकर, प्रा. ना.सी.फडके, म.मो.द.वा.पोतदार, प्रा. नारळीकर वगैरे थोर पुणेकरांची ओळख त्यांना झाली व मैत्रीही झाली. एवढ्यांत धुळे येथील सरकारी ट्रेनिंग कॉलेजांत गायन शिक्षकाची नोकरी प्राप्त झाली आणि ते धुळ्यास आले.

बुवांचे चाहते व शिष्यगण यांचा पसारा खूप मोठा होता. पं. छोटा गंधर्व, तसेच श्रीमती लीलाताई पुस्तके (अमेरिका) यांनी बुवांकडे गायनाचे धडे गिरवले होते असे त्यांनीच मला सांगितले होते. बुवा तत्त्वनिष्ठ होते. नाटकांत गेल्यास गानकलेचा व्यापार होईल अशा समजुतीने ते नाटक कंपन्यापासून दूर राहिले. परिणामी संसार ओढग्रस्त स्थितीत राहिला. उपजीविकेसाठी मुलांना औषधाचे दुकान सुरू करून दिले व ते त्यांनी नावारुपास आणून दिले.

१९३८ साली एक मुलगा आणि एकुलता एक जावई यांचे निधन झाले. तो बुवांवर मोठा आघात होता. मुलीला धुळ्यास घर घेऊन दिले व सगळेच कायमस्वरुपात धुळ्यांस स्थायीक झाले आणि विरक्त होऊन बुवांनी तानपुरा कायमचा खाली ठेवला.

दि. ५.४.१९४७ रोजी धुळ्यांतच त्यांचे मेंदूज्वराने निधन झाले आणि गान साधनेतला एक अध्याय संपला. दुर्दैवाने त्याची गानपरंपरा आता त्यांचे घराण्यात सुरू राहिली नाही. मात्र पुण्याच्या भारत गायन समाजाशी संबंध असल्याने तेथे त्यांचे छायाचित्र मा. द. वा. पोतदार यांचे हस्ते लावण्यात आले आहे व चित्ररुपाने त्यांच्या स्मृती आजही हयात आहेत. टीप :– १) कोल्हापूरचे पाध्ये बुवा व धुळ्याचे पाध्येबुवा या वेगळ्या व्यक्ती होत. २) बुवांना मी भेटलेलो नाही मात्र त्यांचा अल्पपरिचय त्यांचे पुत्र हरिभाऊ व नात कै. सौ. सुमती हर्डीकर यांच्या टिपणावर आधारित आहे.

**– द. वि. हर्डीकर**
**मो. ९३७३५९९०८५**

एक सरदारजी कापड खरेदीसाठी दुकानात जातो आणि म्हणतो
**सरदार –** शर्ट के लिए कपडा दिखाना।।
**सेल्समन –** प्लेनमे दिखाऊं
सरदार भडकतो आणि म्हणतो 'नहीं हेलिकॉप्टर में दिखा।
साले बंदर जहाँ सरदार दिखा नहीं की मजाक शुरु।'

**सासूबाई (सुनेला)** – हे बघ मी या घरात गृहमंत्री आहे अर्थमंत्रालयही मीच सांभाळते,
तुझे सासरे परराष्ट्रमंत्री तर तुझा नवरा अन्न व वस्त्र पुरवठा मंत्री आहे. तुझी नणंद नियोजन व देखरेख मंत्रालय संभाळते तुला कोणतं खात हवं?
**सुनबाई –** मी आपली विरोधी पक्षातच बसते.

# अभिनंदन

## स्वाती अनिल भाटवडेकरांना कॅनडा येथे डॉक्टरेट प्राप्त!



पुणे संघाचे सभासद श्री. अनिल भास्कर भाटवडेकर व सौ. मीना अनिल भाटवडेकर यांची कन्या कु. स्वाती अनिल भाटवडेकर ने डलहौसी युनिव्हर्सिटी हॅलिफॅक्स कॅनडा इथे 'AIR IMPENDANCE, HETEROGENEATY AND VARIBLES IN ADULT ASTHIMA' या विषयावर प्रबंध सादर करून १६ मार्च २०१५ रोजी पी.एच.डी संपादन केली आहे. १९९५ मध्ये कमिन्स मधून बी.ई. (इन्स्ट्र्युमेंटेशन) (पहिली बॅच) विशेष प्राविण्यासह केले होते. नंतर २००५ मध्ये विद्यापीठातून बायोमेडिकल इन्स्टुमेंटेशन या विषयामध्ये एम. ई. केले होते. ह्या बद्दल तिचे हार्दिक अभिनंदन आणि तिला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा !


**॥ रेशीम गांठी ॥®** वर्षे १७वे

पत्रिका - भविष्य - विवाह समुपदेशन

एप्रिल ते जून २०१५ मधील आमचे

**परिचय मेळावे**

**१२ एप्रिल २०१५**
ब्राह्मण प्रथमविवाहाच्या स्थळांसाठी
पदविका, पदवीधर, उच्चशिक्षित
नोकरी / व्यवसाय
वयोगट २० ते ३३ वर्षे (यंग ग्रुप)

**२४ मे २०१५**
ब्राह्मण प्रथमविवाहाच्या स्थळांसाठी
पदविका, पदवीधर, उच्चशिक्षित
नोकरी / व्यवसाय
वयोगट ३० ते ४५ वर्षे (Sr ग्रुप)

**२८ जून २०१५**
ब्राह्मण प्रथमविवाहाच्या NRI स्थळांसाठी तसेच
लग्नानंतर परदेशी जाऊ इच्छिणाऱ्या मुलींसाठी
पदवीधर-उच्चशिक्षित
वयोगट २२ ते ४० वर्षे

**पूर्व नोंदणी आवश्यक - ऑनलाईन नोंदणीची सोय**

**रेशीमगांठीचे सभासद हवे अशी अट नाही.**

रवींद्र देऊस्कर सौ. शीला दाणी-देऊस्कर

अतुल बिल्डर्स, करिष्मा समोर, कोथरूड, पुणे ३८. 25469158 / 9881152746

visit : www.reshimgathi.com e-mail : info@reshimgathi.com

*मेळाव्यातून लग्न जमते!*



कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या ८१ व्या वर्षानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !

**वसुधा एंटरप्रायजेस**

इंटरिअर डेकोरेटर्स

श्री. नंदकुमार सप्रे ९८८१२०८८४८

▪ फर्निचर ▪ प्लंबिंग ▪ पेंटींग ▪ फॅब्रिकेशन ▪ (ग्रिल्स, सेफ्टी डोअर) ▪ अॅल्युमिनिअम स्लायडिंग विंडोज ▪ पार्टिशन्स ▪ डोअर्स पीओपी फॉल्स सिलिंग ▪ लॉफ्ट टँक ▪ स्टेनलेस स्टील डासांच्या जाळ्या ▪ किचन ओटा एक्स्टेंशन ▪ वॉल टायलिंग ▪ फ्लोरिंग ▪ किचन ट्रॉलीज ▪ लॉफ्ट क्लोजींग ▪ संडास बाथरुम वॉटरप्रुफिंग ▪ बाथरुम रिनोव्हेशन ▪ सन कंट्रोल फिल्म ▪ वायरिंग ▪ पीव्हीसी फ्लोरिंग.

वसुधा एंटरप्रायजेस म्हणजे...
... सर्व सेवा एकाच छताखाली



**With Best Compliments**

**Dynamic Engineers**

7/2 Behind K.E.B Power Station
Udyambag – BELGAUM
590008

CMFRS. mechanical
(Railway) Jacks

P.M. Puranik
09448480607

Nakhye Udyog

लग्न, मुंज, साखरपुडा, सभा, प्रदर्शन, संमेलन व इतर कार्यक्रमांकरीता सर्व सोयींनी केटरींग सेवेसह

# सुसज्ज हॉल



आता वातानुकूलित

शुभमंगल कार्यालय

आणि


एव्हरेस्ट हॉल

शुभमंगल केटरर्स, एव्हरेस्ट शॉपिंग सेंटर लोकमान्य चौक,
फडके रोड, डोंबिवली (पूर्व) - ४२१२०१. फॅक्स : २४८३३५१.
फोन : २४३३११३, ३०९११००. संपर्क : योगेश - ९३२३१३३१९१.

एव्हरेस्ट केटरर्स, म. गांधी रोड, डोंबिवली (पश्चिम) - ४२१२०२
फोन : २४९२८६४, ३०९१८९७. फॅक्स : २४८३३५१.
संपर्क : उमेश - ९३२२२८३०३८.

## व्यक्तीपरिचय

# डॉ. गोपाळ सदाशिव पळसुले



महाराष्ट्रातील होमिओपॅथीचे आद्य प्रसारक आणि महाराष्ट्राला परिचित असणाऱ्या सुप्रसिद्ध श्रीकृष्ण होमिओ फार्मसी चे जनक डॉ. गोपाळ सदाशिव पळसुले यांचे घराणे मूळचे कोकणातील राजापूर नजिकच्या धोपेश्वरचे. पळसुले या गावचे खोत होते. ते पंधरा वर्षांचे असतानाच १८९५ साली त्यांच्या वडिलांचे आणि आईचे एखाद दुसऱ्या वर्षाच्या अंतराने निधन झाले.

वडील सदाशिवराव कोल्हापूरच्या बडोदकरी राणीसाहेब यांच्या वाड्यावर राहायचे त्यामुळे डॉ. पळसुल्यांचे प्राथमिक, दुय्यम व प्रिव्हियसपर्यंतचे कॉलेज शिक्षण कोल्हापुरातच झाले. कोल्हापुरातच सुप्रसिद्ध राष्ट्रीय कीर्तनकार डॉ. दत्तोपंत पटवर्धन यांच्याशी पळसुले कुटुंबाचा परिचय होता. पटवर्धन बुवा हे कलकत्याहून होमिओपॅथीचे शिक्षण व पदवी घेऊन आले होते. त्यांनीच डॉ. पळसुलेंना होमिओपॅथी आणि कलकत्त्याविषयी मार्गदर्शन केले. प्रिव्हियसची परीक्षा पास झाल्यानंतर त्यांच्या चिंतामणराव या वडीलबंधुनी १९०५ साली त्यांना होमिओपॅथीचे शिक्षण घेण्यासाठी कलकत्त्यास पाठविले. परंतु डॉ. गोपाळ पळसुलेंनी नॅशनल मेडिकल कॉलेज मध्ये जाऊन ॲलोपॅथीचे शिक्षण घेऊन एल.एम.एस. ही पदवी संपादन केली. त्याच वेळेस त्यांनी होमिओपॅथीचा अभ्यासक्रम पूर्ण करून एल.एच.एम.एस. ही होमिओपॅथीचीही पदवी मिळवली. अशा प्रकारे वैद्यक शास्त्रातील दुहेरी यश संपादून ते १९१० साली कलकत्त्याहून परत आले.

त्या काळात बंगालमध्ये राजकीय चळवळ मोठ्या प्रमाणात होती. त्यामुळे दासबाबूंच्या आणि अरविंद घोषबाबूंच्या राजकारणाची छाप विद्यार्थी दशेतील डॉक्टरांवर विशेष पडली होती. १९११ साली पुण्याला आल्यानंतर त्यांनी टिळक पक्षात प्रवेश करून राजकीय कार्याला प्रारंभ केला.

डॉक्टर होऊन पुण्यात आल्यांनंतर चरितार्थासाठी डॉ. पळसुले आणि डॉ. दत्तोपंत पटवर्धन यांनी पुण्यात दवाखाना चालू केला. होमिओपॅथीचा दवाखाना सुरू तर झाला, परंतु त्यासाठी लागणारी औषधे ही परदेशातून मागवावी लागत होती. राष्ट्रीय कीर्तनकार डॉ. गोपाळ पळसुले यांना ते खुपत होते. त्यातच त्यांना होमिओपॅथीबरोबर बाराक्षाराची औषधेही वापरावी लागत असत. म्हणून पुढे दवाखान्याच्या जोडीला बाराक्षार पद्धतीची औषधे तयार करणारा श्रीकृष्ण होमिओ फार्मसी हा कारखाना ११ जानेवारी १९११ रोजी पुण्यात सुरू केला.

१९१६ साली ते पुणे सार्वजनिक सभेचे प्रथम सदस्य झाले. नंतर चिटणीस, कार्याध्यक्ष, उपाध्यक्ष ही पदेही भूषविली. १९१६ साली त्यांच्याच अध्यक्षतेखाली त्यांनी भारत स्वयंसेवक मंडळाची स्थापना केली. लोकमान्य टिळक १९१४ साली मंडालेच्या तुरुंगातून सुटून आल्यानंतर टिळकांसोबत भारतभर फिरताना त्यांनी आणि त्यांच्या भारत स्वयंसेवक मंडळ या संस्थेने बरेच कामही केले. लोकमान्य टिळकांनी लोकजागरणासाठी सुरू केलेला सार्वजनिक गणेशोत्सव असो किंवा सार्वजनिक शिवजयंती उत्सव असो, सर्व कार्यक्रम सुरळीतपणे साजरे व्हावेत यासाठी या मंडळाचे स्वयंसेवक स्वतः हजर राहून शिस्तपालनाचे आणि सेवाभावाचे काम करीत असत. या संस्थेचा बोलबाला त्याकाळी सर्वसामान्यांपर्यंत तसेच राजकीय कार्यकत्यांत बराच पोहोचला होता.

१९२० साली नागपूर येथे भरलेल्या इंडियन नॅशनल कॉँग्रेस च्या अधिवेशनात डॉ. पळसुलेंनी स्थापन केलेल्या भारत स्वयंसेवक मंडळाने भरीव काम केले होते. त्या वेळेस या संस्थेचे अध्यक्षपद हे डॉ. लक्ष्मण व्ही परांजपे यांच्याकडे, तर उपाध्यक्षपद डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांच्याकडे होते. डॉ. हेडगेवारांनी या संघटनेचे कामकाज जवळून पाहिले आणि ते या संकल्पनेने खूपच प्रभावित झाले.

डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांचे वैद्यकीय शिक्षणही १९१० सालात कलकत्त्याच्या त्याच नॅशनल मेडिकल कॉलेजमध्ये सुरू झाले आणि तेथेच त्यांचाही **पान क्र. १२ वर**

**VIDISHA**
**ENTERPRISES**
Tally Partner
**We provide all Services for Tally Accounting Software**
21/272, Yamunanagar,
Nigdi, Pune - 411 044
**Mob.** : +91-9970156307
**Tel.** : +91-20-27660748
**Email :** meghanathakur@yahoo.com

## व्यक्तीपरिचय
## गोपाळ सदाशिव पळसुले

**पान क्र. ११ वरून**

विद्यार्थ्यांच्या राजकीय चळवळीशी आणि कॉंग्रेसशी संबंध आला होता. टिळकांच्या निधनानंतर जेव्हा कॉंग्रेस पक्षातील नेत्यांचे मतभेद वाढू लागले, त्याच वेळेस इंग्रजांनी भारतातील हिंदू मुस्लिम वादाला खतपाणी घातले आणि हिंदू मुस्लिम दंगे भडकू लागले. कॉंग्रेसमध्येही तेव्हा हिंदू सेवक संघ, भारत सेवक समाज, सर्व्हन्टस् ऑफ इंडिया यासारख्या छोट्या छोट्या संघटना काम करू लागल्या होत्या. यातील काही कट्टर हिंदुत्ववादी होते.

१९२५ साली डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी स्थापन केलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची आणि आता देशभर पसरलेल्या या संघटनेची खरी सुरूवात ही डॉ. पळसुलेंनी १९१६ साली सुरू केलेल्या या भारत स्वयंसेवक मंडळानेच झाली असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. डॉ. हेडगेवार यांच्या संस्थेचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हे नाव आणि त्यांच्या या संघटनेचा आणि स्वयंसेवकांच्या कार्यशैलीचा विचार करता वरील तर्कसंगती पटायला काहीच हरकत नाही.

१९२२ साली डॉ. गोपाळ पळसुले यांना मुळशी सत्याग्रहात भाग घेतल्याबद्दल तीन महिने कारावासही भोगावा लागला होता, तर १९३२ च्या चळवळीत त्यांना सहा महिने येरवडा आणि नंतर नाशिक कारागृहात ठेवण्यात आले होते. १९३३ साली सुटून आल्यानंतर त्यांनी १९४३ पर्यंत स्वातंत्र्यवीर सावरकरांबरोबर हिंदुमहासभेचे देखील कार्य केले.

त्याच काळात त्यांनी होमिओपॅथीच्या प्रॅक्टिसकडे दुर्लक्ष न करता होमिओपॅथी ग्रंथ लेखन आणि औषधे बनविण्याचा कारखाना व त्यांची विक्री याबरोबरच त्यांचा वैद्यकीय व्यवसायही चालू होता.

१९३७ साली पहिले कॉंग्रेसचे मंत्रिमंडळ स्थापन झाल्यावर मुंबई प्रांतामध्ये ॲलोपॅथी, आयुर्वेद आणि युनानी या व्यतिरिक्त इतर सर्व, प्रामुख्याने होमिओपॅथी वैद्यक व्यावसायिकांना त्यांचा व्यवसाय करण्यास प्रतिबंध आणला गेला. त्यावेळचे आरोग्यमंत्री डॉ. गिल्डर यांनी हे वैद्यक नोंदींतील विधेयक विधिमंडळापुढे आणले होते. होमिओपॅथीचा प्रसार करण्यासाठी त्यांनी ५ जून १९३८ रोजी मुंबई प्रांतातील पहिली होमिओपॅथी परिषदेचे सर्वेसर्वा डॉ. गोपाळ पळसुले होते. अतःपासून इतिपर्यंतचा सर्व कार्यक्रम त्यांच्याच मार्गदर्शनाखाली झाला. एकीकडे आपले वैद्यकीय कार्य सुरू ठेवतानाच त्यांनी आपल्या सामाजिक कार्याकडे दुर्लक्ष केले नाही. ते सुरूच होते. साहजिकच त्यांच्या भारत स्वयंसेवक मंडळाच्या प्रभावातून डॉ. हेडगेवारांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली असावी, असे म्हणण्यास वाव आहे.


॥ रेशीम गांठी ॥®
करिष्मा समोर, कोथरूड, पुणे ३८.
माफक फी, वेबसाईट फ्री
☎ २५४६९१५८ / ९८८११५२७४६
वेळ : सकाळी १० ते १२, सायं. ५ ते ८ बुधवारी बंद
e-mail : info@reshimgathi.com
visit : www.reshimgathi.com
सुखी वैवाहिक जीवनासाठी समुपदेशन
वधू-वर नोंदणी
पत्रिका, भविष्य
आणि
परिचय मेळावे


## पटतय का पहा

**राजकारणी**
**सहसा सत्य न बोलणे**
**नित्य टोपी बदलणे**
**मी असे बोललोच नव्हतो**
**असे बोलणे**
**तोच मुरब्बी राजकारणी**
**ऐसे जाणावे**



## पटतय का पहा

**पक्ष प्रवक्ता**
**जो वक्ता**
**ज्यासी दडपून बोलण्याचा**
**मक्ता।।**
**तोची पक्ष प्रवक्ता**
**हे ची जाणावे**
**चतुर माणसाने**



**य.वी. हर्डीकर**
**(९३७३५९९०८४)**


# याला जीवन ऐसे नाव

दि. २८ मार्च 'राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त' खास लेख...

पाण्याला जीवन म्हणतात कारण त्यावर सर्वांचे जगणे अवलंबून असते. एका संशोधक विद्यार्थ्याचे पी.एच.डीचे संशोधन (आणि अर्थात शास्त्रीय जगतातील जीवन) हे पाण्याच्या एका रेणूमुळे कसे तगले याची ही गमतीदार गोष्ट.

इनऑरगॅनिक केमिस्ट्रीचे प्रख्यात शास्त्रज्ञ प्रा. जेसी वेलर यांच्याकडे संशोधन करण्याच्या विद्यार्थ्यांच्या संशोधना संबंधित ही कथा काल्पनिक वाटण्याइतकी रंजक आहे. क्रोमियम धातूच्या आयनचा वापर करुन एक को ऑडिनिशन कंपाऊंड प्रकारचे संयुग त्याने बनविले होते आणि त्या संयुगाच्या गुणधर्मांचा सखोल अभ्यास पुढील चार वर्षे त्याने केला होता (अर्थातच सुरुवातीलाच हे संयुग त्याने शंभर ग्रॅमपर्यंत तरी बनविलेले असणार.)

प्रबंध लेखनाला सुरुवात करण्यापूर्वी शेवटचा एकच प्रयोग करायचे बाकी होते आणि बनवलेले संयुग तर संपून गेले. त्याने मग ते संयुग पुन्हा थोड्या प्रमाणात बनवायचे ठरविले. वारंवार त्याने त्यासाठी प्रयत्न केले पण काही केल्या ते संयुग काही तयार होईना. खरे तर ते संयुग बनवणे फारसे अवघड नव्हते पण कितीही काळजीपूर्वक प्रयत्न करुन प्रयोगास यश मिळेना. आपणच पूर्वी केलेली कृती (जी प्रबंधामध्ये देण्यात येणार होती) यामधील काही बारीकशीही गोष्ट विसरली किंवा चुकीची झाली तरी संयुग मिळण्यात अडचण उदभवण्याची दाट शक्यता होती हे त्या विद्यार्थ्यांच्या लक्षात आले त्यामुळे त्याने सर्व गोष्टी आठवून पुन्हा संगतवार मांडल्या आणि प्रयत्न केले, पुन्हा पुन्हा करुन पाहिले. जवळजवळ सहा महिने त्याने खटपट केली पण ते थोडेसेच ग्रॅम लागणारे संयुग काही हाती पडेना, स्वतःच पूर्वी मुबलक प्रमाणात बनवलेले संयुग आता मात्र बनण्यास तयार नव्हते. पूर्वीच्या केलेल्या सर्व संशोधनावर पाणी सोडण्याची वेळ आली. त्या विद्यार्थ्याच्या तोंडचे पाणी पळाले. प्रा. बेलार यांनाही ही समस्या आव्हान देणारी वाटत होती कारण त्या विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर त्यांचा पूर्ण विश्वास होता. त्यांनी त्या विद्यार्थ्याला मग त्याने कोणत्या बाटल्यातील रसायने वापरून पूर्वी कृती केली ते आठवून पाहण्यास सांगितले. विद्यार्थ्याला प्रा. बेलार यांच्या या सूचनेमुळे



मात्र विचारांची दिशा मिळाली.

क्रोमियमचे संयुग म्हणजे क्रोमियम क्लोराईड वापरुन त्या विद्यार्थ्याने प्रयोग केले होते. सुरुवातीला म्हणजे चार वर्षापूर्वी त्याने मॅलिन्क्रोइट कंपनीने बनवलेले क्रोमियम क्लोराईड हेक्झाहायड्रेट वापरले होते पण आता मात्र त्याने केलेले प्रयोग हे बेकर कंपनीचे क्रोमियम क्लोराईड हेक्झाहायड्रेट वापरुन केलेले होते बस्स इतकाच काय तो फरक होता. पूर्वीच्या बाटलीतील क्षार संपल्यामुळेच त्याला नवी बाटली काढावी लागली होती आणि ती मात्र दुसऱ्या उत्पादकाची होती. दोन्हीही उत्पादनांचे रासायनीक सूत्र तर तेच होते आणि ते बाटल्यांच्या लेबलवर छापलेले होते. केवळ मॅलिन्क्रोड्रट ऐवजी बेकर कंपनीचे उत्पादन वापरल्याने रासायनिक क्रिया अवघड होते की काय? पुन्हा मॉलीन्क्रोइट कंपनीचे बेकर ऐवजीचा क्षार आणण्यासाठी तो विद्यार्थी रसायन विभागाच्या भांडारगृहात गेला. स्टोअरकीपर क्लार्कने स्टोअरमधील रसायनांची यादी तपासली आणि म्हणाला आमच्याकडे बेकर कंपनीचीच उत्पादने शिल्लक आहेत. कदाचित स्टोअर्सच्या मागील भागात मॅलिन्क्रोडट या जुन्या कंपनीची एखादी बाटली मिळाली तर मिळेल, जुना क्षार कशाला घेता? कां त्याला स्कॉच दारुच्या बाटलीसारखे जितकी जुनी तितकी चांगली अशा प्रकारचे महत्व आहे का? क्लार्कने हसत हसतच विचारले मला मॅलिन्क्रोडटसचेच क्रोमियम क्लोराईड वापरावे लागणार आहे बघा ना मिळते का ते प्लीज! विद्यार्थ्याने केलेली कळकळीची विनंती ऐकून क्लर्कने स्टोअरमधील जुन्या अडगळीत हवा तो क्षार शोधण्याचे मान्य केले. विद्यार्थ्यांना स्टोअर्समध्ये आतील भागात प्रवेश नसल्याने आमचा कथा नायक स्टोअर्सच्या दाराशीच घुटमळत राहीला. बरीच शोधाशोध केल्यावर मॅलिन्क्रोडट कंपनीची एक बाटली त्या क्लार्कला मिळाली आणि ती त्याने त्या विद्यार्थ्याच्या हवाली केली. तो विद्यार्थी आनंदातच प्रयोगशाळेत गेला.

स्वतःचीच पूर्वीची कृती काळजीपूर्वक करुन पण मॉलिन्क्रोडट कंपनीचा क्षार वापरुन विद्यार्थ्याने प्रयोग केला आणि तो पूर्णपणे यशस्वी झाला. कोणतीही अडचण न येता त्या विद्यार्थ्याला हवे असणारे संयुग लगेच तयार झाले.

हे कसे घडले याचा प्रा. बेलर आणि त्यांच्या विद्यार्थ्याने अभ्यास केला तेंव्हा असे आढळले की हायड्रेट आयसो मेरिझमचा हा परिणाम होता मॉलिन्क्रोडट आणि बेकर कंपनीने केलेल्या क्रोमियम क्लोराईड हेक्झा हायड्रेटचे सूत्र जरी सारखे असले तरी त्यातील रेणूरचनेमध्ये थोडासा फरक होता. एका उत्पादनामध्ये पाण्याचा एक रेणू क्रोमियम अणूशी निगडीत होता तर दुसऱ्यामध्ये तो नव्हता (एका उत्पादनामध्ये पांच पाण्याचे रेणू आणि एक क्लोराईड आयन हे क्रोमियम घनभारयुक्त आयनशी संबंधित म्हणजे कोऑडिनेशन स्फियर मध्ये असतात व उरलेले दोन क्लोराईड आयन्स हे बनणाऱ्या घन आयन्सचा विद्युतभार समतोल करण्यासाठी वापरले जातात.) अशा प्रकारचा फरक हा स्फटीकीभवन भिन्न तपमानाला केले गेल्यास होतो मॉलिन्क्रेडट व बेकर कंपन्यांनी वापरलेल्या उत्पादन प्रक्रियेत या दृष्टीने फरक असल्याने बनणाऱ्या उत्पादनात वेगळेपणा आला आणि त्याचा परिणाम प्रा. बेलार यांच्या शिष्यास आपल्या संशोधन कार्याद्वारे प्रत्ययास आला. दोन उत्पादनामध्ये केवळ पाण्याच्या एका रेणूच्या कोऑर्डीनेशन गुणधर्मांमध्ये बदल असल्याने म्हणजेच इतर रचना सारखी असूनही थोडेसे बदल असल्याने म्हणजेच इतर रचना सारखी असूनही थोडेसे भिन्नत्व असल्याने निराळेपणा आला असल्याने यालाच आयसोमेरिझम म्हणतात. असो यालाच जीवन ऐसे नाव म्हणावे लागेल.

**– डॉ. विक्रम केळकर, पुणे**



मनाची श्रीमंती ही कुठल्याही श्रीमंती पेक्षा मोठी असते.

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, कोल्हापूर येथे विविध गुणदर्शन कार्यक्रम उत्साहात संपन्न

**संस्थावृत्त**

कऱ्हाडे ब्राह्मण संघातर्फे अठरा फेब्रुवारीला मकर संक्रांतीनिमित्त सभासदांचा विविध गुणदर्शन कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. येथील मंगलधाम सभागृहात सायंकाळी पाचपासून सदस्यांची लगबग सुरू झाली.

कार्यक्रमाची सुरुवात नुपुर खंडकर हिच्या कथ्थक मधील गणेश वंदनेने झाली. त्यानंतरचे दोन तास गायन, वादन, नाट्यछटा, नृत्य असा विविधरंगी कार्यक्रमात कसे संपले, ते कळलेच नाही. रिया बोंद्रे, शिवानी कोटिभास्कर यांच्या नृत्याला विशेष प्रतिसाद मिळाला. चैत्राली जोशी या चिमुरडीने गायलेल्या 'असावा सुंदर चॉकलेटचा बंगला' या गीताने सर्वांना मुग्ध केले. तर रविंद्र पंडित यांच्या खंडोबाचं लगीन' या गाण्यास त्यांच्यासह अनेकांनी नृत्य आणि ठेका यांचा अनोखा संगम घडवला. सौ. अनुराधा गुणे यांच्या 'अशी पाखरे येती घरा' या गाण्याने अनेकांच्या मनातील आठवणींची पाखरे फडफडली. प्राची जोशी आणि विवेक देवस्थळी यांचे हार्मोनियम वादन आणि नितेश जोशी यांच्या नाट्यसंगीताने मैफल उंचीवर गेली. त्यांच्या 'सर्वात्मका सर्वेश्वरा' या भैरवीने मैफलीची सांगता झाली. शीतल महाजनी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

महिलांना हळदी-कुंकू आणि महिलांसह पुरुष वर्गासाठी अत्तर, गुलाब व तिळगुळाच्या वड्या देण्यासाठी पारंपरिक वेशात उपस्थित असलेल्या खंडकर दाम्पत्याने साऱ्यांचे लक्ष वेधून घेतले होते. त्यांच्याबरोबर सौ. प्रिती पंडित व श्रीमती पाध्ये शांताताई यांनीही हळदी-कुंकू देण्यास हातभार लावला. सौ. शितल महाजनी यांनी संघास तिळगुळाच्या वड्या स्वखर्चाने स्पॉन्सर केल्या. यावेळी दरवर्षीप्रमाणे बरेच जणांनी संघास देणग्या दिल्या. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. नंतर संघातर्फे चहा-बिस्कीटांचा आस्वाद सर्वांनी घेऊन कार्यक्रमाची अखेर झाली.

कार्यक्रमाच्या सुरवातीला संघाच्या अध्यक्षा सौ. अनुराधा प्रकाश गुणे यांनी सर्व सदस्यांचे स्वागत व प्रास्ताविक केले. श्री. मिलिंद पावनगडकर यांनी आभार प्रदर्शन केले. सर्वश्री विवेक सरदेसाई, धर्मराज पंडित, मुकुंद गर्दे, शांता पाध्ये, नितेश जोशी, मेघःश्याम मणेरीकर यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. **मिलिंद पावनडकर, कोल्हापूर**

# ज्येष्ठ सभासद श्री. चारुदत्त भडभडे यांचा अभिनंदनीय उपक्रम

पुणे – आयुष्यभर आपले अभियांत्रिकेचे ज्ञान जनसामान्यांसाठी वेचलेले पुणेकर चारुदत्त भडभडे यांनी आपला ८१वा वाढदिवसही वेगळेपण जपून साजरा केला. वयाच्या ८१व्या वर्षात पदार्पण करताना त्यांनी चक्क सलग सहा किलोमीटर पोहण्याचा विक्रम रविवारी नोंदवला. उतारवयात आपला स्टॅमिना आणि फिटनेस सिद्ध करणारे भडभडे यांचा हा विक्रम त्यांचे कुटुंबिय, नातेवाईक, स्नेहीजनांसाठी ही एक आगळी भेट ठरली.

**धाडसी छंदाला नाही वयाची मर्यादा**

चारुदत्त भडभडे हे उच्चविद्याविभूषित व्यक्तिमत्व गेली ५० हून अधिक वर्षे बौद्धिक क्षेत्रात कार्यरत आहेत. विविध कंपन्यांतून त्यांनी अभियांत्रिकीसंबंधित सेवा, सल्ला व संशोधन अशा माध्यमांतून काम केले आहे. पोहण्याचा छंद लहानपणापासून जपलेल्या चारुदत्त यांनी शनिवारी वयाची ८०वर्षे पूर्ण केली. आपला सहस्त्रचंद्रदर्शनी वाढदिवस साजरा करण्यासाठी त्यांनी पोहण्याचा छंद वापरला आणि पुण्याच्या चैतन्य हेल्थ क्लब येथे तीन तासांत तब्बल सहा किलोमीटर अंतर पोहत कापले.



**तीन तासांत सहा किमी**

- सकाळी ९ ते १२ या वेळेत विक्रम.
- ३ तासांत ६ किलोमीटर अंतर पार.
- संपूर्ण वेळ बॅकस्ट्रोकने पोहले.
- टँकमध्ये तब्बल २४० राऊंडस्.

**जिद्दीतून फीनिक्स भरारी**

तीन वर्षापूर्वी ट्रकने उडवल्याने माझ्या आठ फासळ्या तुटल्या. डोक्यालाही जखम झाली. यानंतर मी रोज चालण्याचा, पोहण्याचा व्यायाम सुरू केला. सेल्फ हिप्नॉटिझम थिअरी वापरून मानसिकता बदलली व त्यातूनच हा विक्रम साध्य केला, असे चारुदत्त म्हणाले.

आपले सभासद श्री. चारुदत्त भडभडे यांनी वयाच्या ८१व्या वर्षी तीन तासांत सहा किलोमीटर पोहण्याचा विक्रम केला. श्री. भडभडे यांचे मनःपूर्वक अभिनंदन!

**का व्यां ज ली**

**'मी' घडलो कां? बिघडलो.**

स्त्रोत्र सुमनांजलीची सी.डी.
लावायला लागल्यानंतर,
मी रामरक्षा विसरलो.
'मी' घडलो कां? बिघडलो.
स्कुटर, कारचा जमाना
आल्यापासून
मी चालायला विसरलो.
'खरंच' मी घडलो कां? बिघडलो.
चायनीज, पंजाबी, कॉन्टीनेंटल
खायला लागल्या पासून
'मी' मराठमोळे पदार्थ विसरलो.
'खरंच' मी घडलो कां? बिघडलो.
पेनलेस डिलिव्हरी आल्यापासून
मी 'वेदना' आणि संवेदना विसरलो.
'खरंच' मी घडलो कां? बिघडलो.
सिद्धिविनायकाला रांग लावतांना,
मी सिद्धिचा अर्थच विसरलो,
'खरंच' मी घडलो कां? बिघडलो.
विधात्याला प्रार्थना,
मी घडलो नाही तरी चालेल,
पण मी बिघडता कामा नये
आणि ते सर्व तुझ्या हातात आहे.

**– वासुदेव द. हर्डीकर**
**डोंबिवली, ९९६९१९३३२८**

# 'गौरव बृहन्महाराष्ट्राचा – २०१४' संगीत स्पर्धा

बृहन्महाराष्ट्र मंडळ नवी दिल्ली च्या विद्यमाने नवोदित मराठीभाषीक गायकांची संगीत स्पर्धा दि. २१-९-२०१४ रोजी सकाळी ९ वा. महालक्ष्मी मंदिर, गाजरावाडी येथे आयोजित केली.

प्रादेशिक स्पर्धेच्या या फेरीत १५ उत्साही गायकांनी भाग घेतला आणि आपली कला सादर केली. स्पर्धकांसाठीची अधिकतम वयोमर्यादा ४० वर्षे असली तरी तिशीच्या पलिकडील दोनच स्पर्धक होते. अन्य सर्व स्पर्धक पंचविशीच्या खालीलच होते. यावरून तरूणांच्या सहभागाची आपणास कल्पना येऊ शकते.

विशेष म्हणजे प्रथम क्रमांकावर कु. जिगिषा खेरडिया व कु. अनुष्का पंडित या दोन स्पर्धकांनी समान गुण मिळविल्यामुळे त्या दोघींना, परीक्षकांच्या निवडीनुसार, शास्त्रीय संगीतावर आधारित एक-एक गीत सादर करण्याचे सांगण्यात आले. या वेळी मात्र कु. जिगिषाने थोडे अधिक गुण मिळवून बाजी मारली. त्यानुसार कु. जिगिषा खेरडीया (३१) प्रथम, कु. अनुष्का पंडित (१३) द्वितीय व कु. संपदा पुरोहित (२३) तृतीय याप्रमाणे पुरस्कार मिळविले. परीक्षक म्हणून सौ. पल्लवी जोशी (सहसंयोजिका) व सौ. मेघना अष्टपुत्रे यांनी काम पाहिले. निकाल जाहीर करण्याआधी परीक्षक सौ. मेघना अष्टपुत्रे यांनी स्पर्धे विषयी आणि स्पर्धकांसाठी अनेक उपयुक्त सूचना दिल्या.

या कार्यक्रमांत हार्मोनियमवर श्री श्रीराम दातीर व तबल्यावर श्री संतोष करंजगांवकर यांनी साथ दिली.

उपस्थित मान्यवरांच्याहस्ते प्रथम विजेतीस रु. १,०००/-, द्वितीय विजेतीस रु. ७५०/- व तृतीय विजेतीस रु. ५००/- अशी रोख पारितोषिके देण्यात आली.

कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन कार्यवाह श्री. राजेंद्र देवभक्त व कार्यकारी सभासद श्री. संदीप भट यांनी केले.

कार्यक्रमाची सांगता सर्व उपस्थितांच्या सुरूची भोजनाने झाली. आणि थोडक्यात म्हणजे सर्व प्रेक्षकांनी कान आणि पोट तृप्त झाल्याची एकमुखाने वाखाणणी केली.

**एक जोडपे व्हॉट्सॲप वर गप्पा मारत होते**
**मुलगा – प्रिये झोपली असशील तर स्वप्न पाठव जागी असशील तर आठवणी पाठव हसत असलीस तर खुशी पाठव रडत असलीस तर अश्रु पाठव.**
**मुलीचा रिप्लाय आला**
**अरे भांडी घासतेय रे खरकटं पाठवू?**



# वधू-वर सूची

१) **कु. स्वप्ना सुरेश वाकणकर -पुणे**
जन्म - २१/०३/१९९०., उंची ५.६', घरीहरवश, शिक्षण M.Com, रास - मकर, गोत्र - अत्री, गण - मनुष्य, नक्षत्र - उत्तराषाढा,
**अपेक्षा -** अनुरुप, मिळून मिसळून राहणारा

२) **कु. दिप्ती सुहास पंडित**
जन्म - ०६/०१/१९८१, उंची ५.५', शिक्षण - M.Com, B.ed रास - धनु, गोत्र- कश्यप, गण - मनुष्य, नक्षत्र - पूर्वाषाढा,
**अपेक्षा-** किमान पदवीधर, स्वत:ची जागा, डोंबिवली जवळील परिसराला प्राधान्य

३) **कु. मुग्धा श्रीकृष्ण पाध्ये**
जन्म - ११/०८/१९८०, उंची ५.५', कऱ्हाडे, शिक्षण - Be.com, M.Com, C.A., रास - सिंह, गोत्र -मुदगल, गण-राक्षस, नक्षत्र - मघा
**अपेक्षा -** उच्च शिक्षित, उंची ५.८' च्या पुढे, नोकरी असावी व्यवसाय नको.

४) **कु. रश्मी विनायक करंबेळकर**
जन्म ता. १९/११/१९९०, उंची - ५.१', नक्षत्र - स्वाती, गण - देव, गोत्र - भारद्वाज, चतुर्थ चरण, नाडी - अन्त्य, शिक्षण - B.Sc, MBA - Second Year

१) **कु. विशाल पुरुषोत्तम सप्रे**
जन्म - २१/०७/१९८७ उंची ५.७' कऱ्हाडे, शिक्षण - Industrial Electronic Diploma
रास - वृषभ, गोत्र - अत्री, गण-राक्षस, नक्षत्र - कृतिका
**अपेक्षा -** नोकरी आवश्यक

२) **कु. अमेय विवेक ताटके**
जन्म - २८/०४/१९८७, उंची ५.९' कऱ्हाडे, शिक्षण - M.sc Computer Science
रास - मेष, गोत्र - काश्यप, गण-मनुष्य, नक्षत्र - भरणी
**अपेक्षा -** अनुरुप, स्वजातीय किंवा चित्पावन ब्राह्मण.

४) **वर : चि. वैभव संजीव जोशी** (Divorcee) ज. ता. २७-४-१९६९ Exe. Engr. In MNC at Goa. आई व एक विवाहीत भाऊ आहे. Pay : Rs. ७६०००/- pm : कऱ्हाडे, सिंह रास, अंत्य नाडी, राक्षस गण, ज. स्थळ : कोल्हापूर Cont No. ९८२२५८८०९९ / ०८३१-२४३१६५३

५) **श्री. मानस मकरंद भागवत** रास - वृश्चिक, गोत्र - वसिष्ठ, गण - राक्षस, रक्तगट - AB+ वय - २८ वर्ष, उंची - ५.९, व्यवसाय - फोटोग्राफी

**प्रदीप श्री. हळबे**
वधू-वर सूचक केंद्र प्रमुख, कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ डोंबिवली, जि. ठाणे

काव्यांजली

## ''कुल आणि शील''

व्यास जन्माला हीन कळीच्या धीवर कन्योदरी।।
त्याची कवने टिपतो साक्षात गणेश आपुल्या करी।।
कुरुवंशीचा दासीसुत तो विदुर बिचारा जरी।।
सुयोधनाहूनी अन्नतयांचे प्रिय माने श्रीहरी।।
कुलनितेमधि सुयोधनाहून नवा जरी अर्जुन।।
कृष्णे अपुली भगिनी दिधली त्यासच आवर्जुन।।
येशुख्रिस्त जरी थोर हुतात्मा कुमारिकेचा बालक।।
स्वयंसिद्ध तो नवधर्माचा ठरला संस्थापक।।
न च कबिराची जात नऊ की ना हिंदुबा म्लेंछ
न परी तयांचे शेले विणतो साक्षात् रघुनंदन्।।
संन्याशाचा पोर म्हणुनी जगे हिणविले जरी ।।
संत महिंता नुरे अहंता पढता ज्ञानेश्वरी।।
दीन–दलित तो अंत्यजातीचा चोखामेळा जरी।।
त्याची ढोरे हरी ओढतो सोडुनिया पंढरी।।
नीच पतित ती वेश्या केवल कान्होपात्रा जरी।।
तिच्या वाचुनि संतमालिका अपुरी राहो खरी।।
कुलीन जन ते जन्मावरूनी हीन जाया समजले।।
भगवंताचे अधिष्ठान का तेथे नच आढळे?
कुलीनतेची जरी थोरवी अभिमानास्पद नरा।।
कुलाहूनही शील नराचे प्रिय वाटे ईश्वरा।।


*With Best Compliments from,*

**Reindeer Apparels**

for
jerkins and jackets

**Manini Gurjar**

1275, Shukrawar Peth,
Neha Apartments,
Subhash Nagar, L.No. 6,
Pune - 411 002

**Phone : 020-24476336, 24483225**
**Fax : 020-24454787**
E-mail : dispomed@vsnl.com



# सातारी पेढा शॉप



संस्थापक
**कै. वासूदेव महादेव जावडेकर**

स्थापना-१९३६



**मशहूर**

सातारी पेढे
काजू बर्फी
आंबा बर्फी
गुलकंद बर्फी
श्रीखंड वडी

**चटकदार**

फरसाण
स्पेशल चिवडा
सुकामेवा
खारा काजू
चटणी वगैरे

श्रीखंड आणि चक्का

## पौष्टीक खाद्य भांडार

अभ्यंकर रोड, सीताबर्डी, नागपूर–440012, फोन : 0712–2525704

# ''मराठीतील सदाबहार गीते''

''मराठी असे आमुची मायबोली'' असे आपण अभिमानाने म्हणत असतो. अनेकविध प्रकारांनी मराठीत साहित्य निर्मिती होत असते. काव्य, लेख, निबंध, कादंबऱ्या, प्रवास वर्णने असे अनेक प्रकार आहेत त्यापैकी काव्यामुळे आपले मनोरंजन होते. यामध्ये अभंग, भावगीते, प्रेमगीते विरहगीते, चारोळ्या, विडंबनात्मक कविता असतात, गीते असतात. तर ही अनेक प्रकारची गीते आपणांस भावतात; कारण त्यामध्ये कदाचित आपल्या भावना व्यक्त झालेल्या असतात आपण अनेक अवस्थांमधून जात असतो कधी आनंदात, तर कधी चिंतेत, तर कधी निराशेत असतो. त्यावेळी अशी अनेक गीते आहेत; ती आपणांस आठवली तर मन प्रफुल्लीत होते आणि आपण ती गाणी ऐकतो, म्हणतो, गुणगुणतो. आपणांस अशी काही गीते निश्चितच आवडत असतील आणि आपल्या चित्तवृत्ती प्रफुल्लीत करत असतील; तर त्याचा आनंद आपणही घ्यावा आणि इतरांनाही तो द्यावा अशा इच्छेतून हे सदर सुरू करावे, असे सुचले. त्यापैकी मला जी गीते भावली त्यापैकी दोन गीते की ती सर्वांनाच आवडतील यात लहान मोठी तरुण, तरुणी, वुद्ध अशा सर्वांना भावणारी असावीत असे वाटते.

आपणांकडून या सदरास निश्चितच उत्तम प्रतिसाद मिळेल अशी आशा आहे.



## गीत – जिथे सागरा धरणी मिळते

गीतकार – पी सावळाराम
संगीत – वसंत प्रभू
स्वर – सुमन कल्याणपूर
चित्रपट – पुत्र व्हावा ऐसा
राग – यमन

जिथे सागरा धरणी मिळते
तिथे तुझी मी वाट पहाते

डोंगर दरीचे सोडून घर ते
पल्लव पाचूंचे तोडून नाते
हर्षाचा जल्लोष करूनी जेथे
प्रीत नदीची एकरुपते

वेचित वाळूचे शंख शिंपले
रम्य बाल्य ते तिथे खेळले
खेळाचा उल्हास रंगात येऊनी
धुंदीत यौवन जिथे डोलते

बघुनी नभीची चंद्रकोर ती
सागर ह्दयी उर्मी उठती
सुखदुःखाची जेथे सारखी
प्रीत जीवना ओढ लागते

जिथे सागरा धरणी मिळते
तिथे तुझी मी वाट पहाते



## गीत – आकाश पांघरुनी जग शांत झोपले हे

गीतकार – मधुकर जोशी
संगीत – दशरथ पुजारी
स्वर – सुमन कल्याणपूर
राग – यमन

आकाश पांघरुनी जग शांत झोपले हे
घेऊन एकतारी गातो कबीर दोहे
गगनात हासती त्या स्वप्नातील मंद तारा

वेली वरी सुखाने निजला मंदवारा
कालिंदीच्या तीरी या जळ संथ संथ वाहे
भरला स्वरांत त्याच्या भक्तीतला सुगंध
ओठात आगळाच आनंद काही धुंद
त्याच्या समोर पुढती साक्षात देव आहे

काहूर अंतरीचे भजनात लोप होई
भक्तीत श्री हरीच्या मन हे रमून जाई
उघडून लोचनांना तो दिव्य रुप पाहे

आकाश पांघरुनी जग शांत झोपले हे
घेऊन एक तारी गातो कबीर दोहे

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, बेळगाव येथील महिला दिनाच्या कार्यक्रमातील सौ. निर्मला पित्रे यांनी केलेले कानडी भाषण

ಶ್ರೀ

ವೇದಿಕೆಯ ಮೇಲೆ ಆಸೀನರಾಗಿರುವ ಗಣ್ಯರೇ ಹಾಗೂ ನನ್ನ ಸಹೋದರ ಸಹೋದರಿಯರೇ, ಮಾರ್ಚ ೮ ಮಹಿಳಾ ದಿನಾಚರಣೆ ಅಂಗವಾಗಿ ಇಂದು ಕೆಲವೂಂದು ಕಾರ್ಯಕ್ರಮ ಹಮ್ಮಿಕೊಂಡಿದ್ದೇವೆ, ಎಂದರೆ ಈ ಕಾರ್ಯಕ್ರಮ ಮಹಿಳೆಯರ, ಮಹಿಳೆಯರಿಗಾಗಿ ಹಾಗೂ ಮಹಿಳೆಯರಿಂದ, ಎಂದರೆ ಕೇಳಲು ಎಷ್ಟು ಸಂತೋಷವಾಗುತ್ತದಲ್ಲವೇ? ಒಂದುಕಾಲದಲ್ಲಿ ಎಂದರೆ ಮಾನುವಿನ ಸಿದ್ಧಾಂತದ ಪ್ರಕಾರ "ನ ಸ್ತ್ರೀ ಸ್ವಾತಂತ್ರಂ ಅರ್ಹತಿ" ಎಂದರೆ ಅವಳಿಗೆ ಸ್ವಂತ ಆಸ್ತಿತ್ವವೇ ಇಲ್ಲದಂತಾಯಿತಲ್ಲವೇ ? ಅದೇ ರೀತಿ ನಮ್ಮ ಭಾರತೀ ಭಟ್ಟ ಅವರು ತಯಾರಿಸಿದ ಪುರಾಣಕಾಲದ ರೂಪಗಳಲ್ಲಿ ಕೂಡಾ ನಾವು ಸ್ತ್ರೀಯ ಶೋಷಣೆಯನ್ನೇ ಕಾಣಬಹುದು. ಆದರೆ ಕಾಲದಲ್ಲಿ ಬದಲಾವಣೆ ಆಗ್ತಾ– ಆಗ್ತಾ ಇಂದು ಸ್ತ್ರೀಗೆ ಪ್ರತೇಕ ಸ್ಥಾನಮಾನ ಸಿಕ್ಕಿದೆ, ಹಾಗೂ ಮಹಿಳಾದಿನಾಚರಣೆ ಆಚರಿಸುವ ಮಟ್ಟಿಗೆ ಬದಲಾವಣೆ ಆಗಿದೆ. ಭಾರತೀಯ ಸಂವಿಧಾನ ಪುರುಷನಷ್ಟೇ ಸ್ತ್ರೀಗೂ ಸಮಾನ ಅವಕಾಶ ನೀಡಿದೆ ಒಟ್ಟು ಜನಸಂಖ್ಯೆಯಲ್ಲಿ ಶೇಕಡಾ ೫೦ ರಷ್ಟು ಸ್ತ್ರೀಯರಿದ್ದಾರೆ.

ಇಂದು ಯಾವುದೇ ರಂಗದಲ್ಲಿ ನೋಡಿ, ಪುರುಷರ ಸಮಜೋಡಿ ಆಗಿ ಸ್ತ್ರೀ ಮುಂದುವರೆದಿದ್ದಾಳೆ (ಕ್ರೀಡೆಯಲ್ಲಿ ಅಶ್ವೀನಿ ನಾಚಪ್ಪ, ಸೈನಾ ನೆಹ್ವಾಲ ಹಾಗೂ ಇನ್ನಿತರರು ಬಹ್ಯಾಕಾಶ ಯಾನ ಮಾಡಿದ ಸುನಿತಾ ವಿಲಿಯಮ್ಸ್, ಸಾಹಿತ್ಯ ಕ್ಷೇತ್ರದಲ್ಲಿ ಅನುಪಮಾ ನಿರಂಜನ, ರಾಜಕೀಯ ಕ್ಷೇತ್ರದಲ್ಲಿ ಕಿರಣ ಬೇಡಿ ಸುಷ್ಮಾ ಸ್ವರಾಜ ಹೀಗೆ ಎಷ್ಟೋ ಉದಾಹರಣೆ ನೀಡಬಹುದು. ಅಷ್ಟೇ ಏಕೆ ಇಂದು ಧಾರ್ಮಿಕ ಕ್ಷೇತ್ರದಲ್ಲಿ ಕೊಡಾ, ಸ್ತ್ರೀ ಮನುಷನ ಹುಟ್ಟಿನಿಂದ ಹಿಡಿದು ಸಾವಿನವರೆಗೆ ಎಲ್ಲ ಕ್ರಿಯೆಗಳನ್ನು ಸಾಂಗವಾಗಿ ನೆರವೇರಿಸ ಬಲ್ಲಳು. ಓದ್ಯೋಗಿಕ ಕ್ಷೇತ್ರದಲ್ಲಿ ಕೂಡಾ ಸುಧಾಮೂರ್ತಿಯವರ ಉದಾಹರಣೆ ಕೊಡಬಹುದು. ಇಂದು Infosis ದಂಥ ದೊಡ್ಡ ಕಂಪನಿಯ ಒಡತಿಯಾಗಿ ಎಷ್ಟೊ ಜನರಿಗೆ ಉದ್ಯೋಗ ಸೃಷ್ಟಿಸುವಲ್ಲಿ ಸಫಲರಾಗಿದ್ದಾರೆ. ಇಂದು ಸರಕಾರಿ ರಂಗದ ದೊಡ್ಡ ಹುದ್ದೆಗಳಲ್ಲಿ ಕೂಡ ಸ್ತ್ರೀ ತನ್ನ ಸಾಮರ್ಥ ತೋರಿದ್ದಾಳೆ ಹಾಗಾಗಿ ಇಂದು ಎಲ್ಲಾ ಕಂಪನಿಗಳಲ್ಲಿ ಸ್ತ್ರೀಯರ ಸಂಖ್ಯೆಯೇ ಹೆಚ್ಚು ಮನೆ ಹಾಗೂ ಹೊರಗಿನ ಕ್ಷೇತ್ರಗಳಲ್ಲಿ ದುಡಿದು ಎರಡನ್ನೂ ಸಮಾದಾಗಿಸುವ ಜಾಣ್ಮೆ ಅವಳಲ್ಲಿದೆ. ಆದ್ದರಿಂದ ಸ್ವಾಭಾವಿಕವಾಗಿ ಅವಳಿಗೆ ಆರ್ಥಿಕ ಸ್ವಾತಂತ್ರ ಸಿಕ್ಕಿದೆ.

ಆದರೆ ಒಂದು ವಿಷಯ ಅವಳಿಗೆ ಆರ್ಥಿಕ ಸ್ವಾತಂತ್ರ ಹಾಗೂ ಸಮಾನತೆ ಏನೋ ಸಿಕ್ಕಿದೆ ಇದು ನಮ್ಮಂಥ ಮಧ್ಯಮವರ್ಗದ ಜನರಲ್ಲಿ ಮಾತ್ರ Higher Class ಬಿಡಿ, ಅವರಲ್ಲಿ ಹೆಂಗಸರಿಗೆ Full Freedom ಎಂದರೆ ಸ್ವಚ್ಛಂದಂತೆ. ಅದೂ ಆತಂಕಕಾರಿಯೇ ಆದರೆ ಕೆಳವರ್ಗದವರಲ್ಲಿ ಹಾಗೂ ಗ್ರಾಮೀಣ ಪ್ರದೇಶಗಳಲ್ಲಿ ಇನ್ನೂ ಹೆಂಗಸರ ಶೋಷಣೆ ಹಾಗೂ ದಬ್ಬಾಳಿಕೆ ನಡೆದೇ ಇದೆ. ಅವರಲ್ಲಿ ಹೆಂಗಸರು ಎಷ್ಟೇ ದುಡಿದರೂ ಬಂದ ಕ್ಷಣದಲ್ಲಿ ಮನೆಯ ಒಡೆತಿಯು ಅಲ್ಲಾ ಅವನ ಅರ್ಧಾಂಗಿಯಾಗಿ ಅಲ್ಲಿ ಪರುಷನ ಅಧೀನಳು. ಇನ್ನು ಎಷ್ಟೋ ಕಡೆಗಳಲ್ಲಿ ಪುರುಷ ಪ್ರಧಾನ ಕುಟುಂಬದ ವಾತಾವರಣವೇ ಇದೆ ಇಷ್ಟೇಏಕೆ ಹೆಣ್ಣು ಶಿಶುವಿನ ಭ್ರೂಣಹತ್ಯೆ ಕೂಡಾ ಇದೆ. ಹುಟ್ಟಲಿರುವ ಶಿಶು ಹೆಣ್ಣು ಎಂದು ಗೊತ್ತಾದೊಡನೆ ತಕ್ಷಣ ಕರುಳುಬಳ್ಳಿಯನ್ನು ಕಿತ್ತೂಗೆಯುವರು. ಅದಕ್ಕೇ ಬಲ್ಲವರು ಹೇಳಿರುವರು **"ಹೆಣ್ಣು – ಹೆಣ್ಣೆಂದು ಜರೆಯದಿರಿ, ಜಗನ್ಮಾತೆ ಹೆಣ್ಣಲ್ಲವೇ, ನಿಮ್ಮನ್ನು ಹೆತ್ತ ಅಮ್ಮ ಹೆಣ್ಣಲ್ಲವೇ?"**

ಸಂಸ್ಕೃತದಲ್ಲಿ ಒಂದು ಶ್ಲೋಕವಿದೆ **"ಯತ್ರನಾರ್ಯಸ್ತು ಪೋಜ್ಯಂತೆ, ರೆಮಾಂತೆ ತತ್ರ ದೇವತಾ"** ಎಂದರೆ ಎಲ್ಲಿ ಸ್ತ್ರೀಯರಿಗೆ ಗೌರವ ಮರ್ಯಾದೆ ಅಲ್ಲಿ ದೇವತೆಗಳು ಸಂಪ್ರೀತರಾಗುತ್ತಾರೆ. ನಮ್ಮ ದೇಶದಲ್ಲಿ ಹೆಣ್ಣು ಮಕ್ಕಳ ಮೇಲೆ ಆಗುವ ಅತ್ಯಾಚಾರ ಬಹುಶಂ ಜಗತ್ತಿನಲ್ಲಿ ಎಲ್ಲಿಯೂ ಆಗಲಿಕಿಲ್ಲ. ಇಂದು ಹೆಣ್ಣು ಎಷ್ಟೇ ಸರಿಸಮಾನಳಾದರೂ ಒಬ್ಬಂಟಿಯಾಗಿ ನಿರ್ಭಯವಾಗಿ ಸಾಂಚರಿಸುವ ವಾತಾವರಣ ನಮ್ಮಲ್ಲಿಲ್ಲ. ಈಗೀಗಂತೂ ದಿನ ಬೆಳಗಾದರೆ ಪತ್ರಿಕೆಯಲ್ಲಿ ಓದುವದು ಇದನ್ನೇ ಎಂದರೆ ಲೈಂಗಿಕ ಶೋಷಣೆಯ ವಿಚಾರವೇ ಯುವತಿಯರಷ್ಟೇ ಅಲ್ಲ, ಆಪ್ರಾಪ್ತ ಬಾಲಕಿಯರ ಮೇಲೆ ಅತ್ಯಾಚಾರವೆಸಗಿದೆ ವಿಷಯವಿರುತ್ತದೇ. ಅಂದರೆ ನಾವು ನಮ್ಮ ಪುಟ್ಟ ಕಂದಮ್ಮನನ್ನು ಕೊಡ ನಿರ್ಭಯವಾಗಿ ಶಾಲೆಗೆ ಕಳಿಸುವಂತಿಲ್ಲ. ಎಂದರೆ ಎಷ್ಟರಮಟ್ಟಿಗೆ ಸ್ತ್ರೀಗೆ ಸುರಕ್ಷತತೆ ಇದೆ? ಅದಕ್ಕೇ ಮಹಾತ್ಮಾ ಗಾಂಧೀಜಿಯವರು ಹೇಳಿರುವ ಯತಾವತ್ತು ಒಂದು ಹೆಣ್ಣು ರಾತ್ರಿಯಲ್ಲಿ ಕೊಡ ನಿರ್ಭಯವಾಗಿ ಸಂಚರಿಸಬಲ್ಲಳೋ ಅವತ್ತೇ ನಿಜವಾದ ಅರ್ಥದಲ್ಲಿ ಸ್ತ್ರೀಗೆ ಸ್ವಾತಂತ್ರ ಸಿಕ್ಕ ಹಾಗೆ ಹಾಗೂ ಆದೇ ರಾಮರಾಜ್ಯ. ಆ ರಾಮರಾಜ್ಯದ ಕನಸು ಯಾವತ್ತು ನನಸಾಗುತ್ತದೋ ಎಂದು ಕಾದು ನೋಡಬೇಕು.

ಇಷ್ಟು ಮಾತನಾಡಲು ಅವಕಾಶ ಕೊಟ್ಟಿದ್ದಕ್ಕಾಗಿ ಧನ್ಯವಾದಗಳು.

**ಶ್ರೀಮತಿ. ಶೀತಲ ಅ. ಪಿತ್ರೆ**

# सौ. निर्मला पित्रे यांच्या कानडी भाषणाचा मराठी अनुवाद

सभागृहात उपस्थित असलेले सर्व मान्यवर आणि माझ्या बंधू भगीनींनो ८ मार्च महिला दिनानिमित्त काही कार्यक्रम आयोजित झाला. हा कार्यक्रम महिलांचा, महिलांसाठी, महिलांमुळे झाला. ऐकायला किती आनंद होतोय ना? एका काळात मानवाच्या तत्वाप्रमाणे 'न स्त्री स्वातंत्र्यम् अर्हति।' म्हणजेच तिला स्वतःचे अस्तित्व नव्हते. आपल्या भारती भट्ट यांनी तयार केलेल्या पुराणांमध्ये सुद्धा स्त्री शोषण दिसून येते. पण काळानुसार बदल होऊन आज स्त्रीला सर्वत्र सन्मान दिला आहे; व महिला दिन साजरा करण्याइतपत बदल झाला आहे. भारतीय संविधानामध्ये पुरुषांइतक्याच स्त्रीला समान संधी दिल्या जात आहेत. एकूण जनगणनेमध्ये ५०% वाटा स्त्रीयांचा आहे.

आज कोणत्याही क्षेत्रात बघा, स्त्री पुरुषांशी बरोबरी साधून प्रगती करत आहे. खेळात अश्विनी नाचप्पा, साईना नेहवाल व अजून अवकाश क्षेत्रात सुनिता विल्यम्स व साहित्य क्षेत्रात अनुपमा निरंजन, राजकीय क्षेत्रात किरण बेदी, सुषमा स्वराज अशी अनेक उदाहरणे देऊ शकतो. इतकेच काय धार्मिक क्षेत्रात पण स्त्री माणसाच्या जन्मापासून, मृत्यूपर्यंत सर्व कार्य व्यवस्थितरीत्या करू शकते. औद्योगिक क्षेत्रात सुधा मुर्तींचे नाव देऊ शकतो. आज इन्फोसिस सारख्या विशाल कंपनीच्या मालकीण असून कित्येक लोकांना रोजगार दिला आहे. आज सरकारी कचेरीत देखील मोठ्या पदावर स्त्रीया दिसून येतात. तसेच सर्व कंपनीत स्त्रीयांची संख्या मोठ्या प्रमाणात आढळून येते. स्त्री घरात तसेच बाहेरील क्षेत्रात काम करून दोन्हीत समतोल साधते. त्यामुळे स्वाभाविक रित्या आर्थिक स्वातंत्र्य मिळाले आहे. पण एक आहे की उच्चवर्गीय व मध्यमवर्गीय लोकांमध्ये स्त्रीयांना आर्थिक स्वातंत्र्य आणि समानता मिळाली आहे पण खालच्या वर्गामध्ये आणि ग्रामीण भागात अजून स्त्रीयांचे शोषण होत आहे. त्यांच्यामध्ये तिने कितीही कमवले तरी ती नवऱ्याची आधीनच आहे. अजूनही कित्येक ठिकाणी पुरुषप्रधान वातावरण आहे. इतकेच काय, जन्माला येणारं मुल मुलगी असल्याचे समजल्यावर भृणहत्या केली जाते. म्हणून सज्ञनांनी सांगितले आहे की, ''स्त्रीला कमी लेखू नका जगन्माता ही स्त्री नव्हे का? आपल्याला जन्म देणारीसुद्धा एक स्त्रीच आहे.

संस्कृतमध्ये एक श्लोक आहे, ''यत्रनार्यस्तु पुज्यन्ते, रमन्ते तत्र देवता'' म्हणजे जेथे स्त्रीयांना मान सन्मान आहे तिथे देव संतुष्ट होतात. आपल्या देशात मुलींवर होणारे अत्याचार इतर कुठल्याही देशांपेक्षा जास्त आहेत. आज महिला कितीही स्वावलंबी झाली तरी एकटी फिरण्यास वातावरण अनुकूल नाही. आजकाल दररोज वर्तमानपत्रात मुलींच्या शोषणाच्या बातम्या कानावर पडतात. केवळ युवतींवरील नव्हे तर लहान मुलींवरील देखील अत्याचाराच्या बातम्या येतात. म्हणजे आपण आपल्या लहान मुलींना शाळेतसुद्धा निश्चिंत सोडू शकत नाही. म्हणजे मुलींसाठी किती सुरक्षित वातावरण आहे? म्हणून गांधीजींनी सांगितले आहे की, ज्या दिवशी एखादी मुलगी रात्री अपरात्री निर्भय होऊन फिरू शकेल त्या दिवशी तिला खरे स्वातंत्र्य प्राप्त होईल. आणि रामराज्याचे स्वप्न कधी खरे उतरेल याची वाट बघावी लागेल. धन्यवाद!! मला बोलण्याची संधी दिली....

**सौ. निर्मला पित्रे.**

## पाककृती

**१ कॉर्नफ्लेक्सचे लाडू**

सामग्री – १ वाटी कॉर्नफ्लेक्सचा चुरा
१ वाटी भाजलेल्या पोह्याचा चुरा
१/२ वाटी किसून भाजलेलं खोबरं
१/४ वाटी खारीक पुड
१० खजूर बारीक तुकडे करून
१/२ वाटी गूळ
१/२ वाटी तूप



कृती : कॉर्नफ्लेक्स चुरा थोडा भाजून घेणे त्यामध्ये १ वाटी पोहे तळून चुरा करून भाजलेल्या कॉर्नफ्लेक्स मध्ये घालणे. त्याचप्रमाणे खारीक पूड, भाजलेलं खोबरं चुरून सर्व मिश्रण एकत्र करणे त्यात खजूराचे किंवा काजू अगर बदामाचे तुकडे घालणे त्यात गरम करून तूप घालणे नंतर गुळामध्ये ३ चमचे पाणी घालून त्याचा थोडा पाक करून सर्व मिक्स करून लहान लाडू वळणे. मुलांना हे लाडू खूप आवडतात व पौष्टीकही आहेत.



**कोबीच्या वड्या**

साहित्य : १ वाटी किसलेला कोबी
१ मध्यम आकाराचा बारीक चिरून कांदा
तिखट, मीठ, धने, जिरपूड, बारीक चिरून कोथींबीर, तीळ, अर्धी मुठ ओट्सचा चुरा व हे सगळं मिसळून मावेल तेवढे डाळीचे पीठ व १ चमचा तांदूळ पिठी.

कृती : वरील सर्व जिन्नस एकत्र करून कालवणे या मध्ये अगदी थोडसं पाणी लागतं अंदाजे ४ ते ५ चमचे. सर्व मिश्रण तेल लावलेल्या पातेल्यात थापून कुकरमध्ये शिट्टी काढून १० मिनिटे उकडणे. उकडून गार झालेल्या मिश्रणाच्या वड्या कापणे व तव्यावर शॅलो फ्राय करणे. खुसखुशीत व चविष्ट वडी तयार न आवडणाऱ्या कोबीच्या चविष्ट वड्या होतात.

मोबाईलच्या आगमनामुळे बऱ्याच गोष्टी सुकर झाल्या आता एस्.टी.डी, ट्रंककॉल नकोत. पत्र पाठवणे हे तर बंदच झाले. त्याची जागा एस्.एम्.एस्. / एम्.एम्.एस्. ने घेतली. पण एस्.एम्.एस्. / एम्.एम्.एस्.ला खर्च येतो. नवीन संकल्पना पुढे आली ती म्हणजे Whats App. हा तर एक खेळच झाला; आणि एस्.एम्.एस्. / एम्.एम्.एस्. ही संकल्पना बाद झाली. Whats App ला कोणताही खर्च नाही/शब्दांचे बंधन नाही. यामुळे हे खूपच लोकप्रिय झाले. ही अ‍ॅप फारच वापरांत आली यावरून, फोटोही टाकले जातात. कविता, विनोद, दासवाणी काय नाही ते विचारा. पण याचा अतिरेक होत आहे. अनेक ग्रुप होतात व ''इधरका माल उधर''या उक्तीनुसार आलेला मेसेज लगेचच दुसऱ्या ग्रुपला फॉरवर्ड केला जातो. असे अनेक मेसेजेस फिरून फिरून परत आपल्याकडे येतात. म्हणूनच चांगले मेसेजेस कविता विनोद हे संग्रही असणे किंवा त्याचा अन्य कार्यक्रमातही वाचून दाखवण्यास उपयोग करणे सहज शक्य व्हावे यासाठी Whats App हे सदर आपण 'संपर्क'च्या १० व्या वर्षात सुरू करणार आहोत. अनेक चांगल्या गोष्टी यामाध्यमातून आपल्या संग्रही येतात त्याचा आपल्याच लोकांना आनंद मिळावा म्हणून Whats App सदर सुरू करीत आहोत.

आपणांस विनंती की रिपोर्ट न झालेले चांगले सुविचार कविता, विनोद आपण पाठवा योग्य वाटल्यास त्यांना प्रसिद्धी देता येईल. यासाठी काही दोन चार वानगी दाखल सादर.

**– श्री. गणेश गुर्जर**

**आयुष्य एक मिसळ आहे.**

ज्यात सुखाचे मोड आलेले
मूग आणि मठ शोधावे लागतात.
असंख्य अनुभवांचं फरसाणच अधिक असतं.
ढिगभर आणि डिशभर दुःखाचा कांदा
डोळ्यांत पाणी आणतो.
स्नेह, आपुलकी, प्रेम यांची हिरवीगार
कोथिंबीर मिसळीची शोभा वाढवते
मतभेदाचं दही लिंबू जिभेला चरका मारत
तरी ते हवं असतं.
स्वप्नांच्या ठिसूळ पापडाचे
क्षणाक्षणांत तुकडे होतात
मनोरथांच्या रश्यात मनाचा पाव
जितका बुडवावा मैतराबरोबर अशा मिसळीची
लज्जत चाखण्यांत खरी मज्जा असते
आणि अशा वेळी हातातला स्टीलचा
चमचा देखील
सोन्याचा होऊन जातो


**।।श्री।।**

**स्थापना : गणेश चतुर्थी १९९३**

**सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा**
**प्रकाश जठार यांचे**

# ज्योती एन्टरप्रायझेस

**(निवडलेला किराणा माल, सर्व प्रकारचे मसाले व सुका मेवा होलसेल व रिटेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण)**

**पत्ता – गाळा नंबर २, गिरीश अपा., गोपाळ नगर,**
**गल्ली नंबर २, डोंबिवली (पूर्व) पिन – ४२१२०१,**
**फोन–०२५१२४४१२१२, भ्रमणध्वनी – ९८१९२५१४१२**

# With Best Compliments from

# PRAKASH HOME INDUSTRIES

PHI
SINCE 1960

**An ISO 9001 : 2008 Certified Company**


PHI the manufacturers of small machine tools, started its activity in small workshop in the year 1960 in Belgaum City. Initially it started producing Hand Operated Punching Machines, Hand Presses and Sheet metal components. In the year 1976 it shifted its factory in modern building in Udyambag, Belgaum for better production. Now PHI is manufacturing small machine tools-Radial and Pill Drilling Machines, Centre Lathes, Vertical Spindle Surface Grinders, Tool and Cutter Grinder, Filing Machine. All machines are designed and manufactured indigeneously. Machine tools are produced with good quality of Raw Materials, rigorous quality control and skilled workmanship. PHI is known for producing Finest Quality of machine tools in small sector, for Reliability and prompt after sales service.

**Address**

R. S. No. 695-C, Near Rani Channamma Nagar, IInd Stage, Udyambag, BELGAUM - 590 008. (INDIA) Phone: +91 - 831 - 2441626,2442390 Fax: +91 o 831 - 2445026 Mobile: 09448395664
E-mail: phibgm@gmail.com

**Manufacturers of :** Machine Tools, Radial Drilling Machines, Surface Grinders, Filing Machines, Tool & Cutter Grinders etc.

**Sheet Metal Parts :** Air Cleaner Housing, Pre cleaners, Silencers, Tanks, Hoods, Pipe Bends etc.




DRILLING MACHINE
Model - PRD - 7 / PRD -10

Fabricated Parts
Manifold Exhaust, Silencers, Pipe bends, Air Cleaner Assembly etc..



**MANUFACTURE OF MILD STEEL SHEET METAL PRESSED COMPONENTS & ASSEMBLIES LIKE...**

- Exhaust Manifolds
- Various size elbows, bend pipes for Air, Water, oil circulation
- Housings for Air Cleaner Filters.
- Exhaust Connections
- Fuel Tanks
- Brackets, clamping rings, covers etc.
- Exhaust Silencers.



(VERTICAL SPINDLE SW VELLING HEAD ROTARY TABLE)
SURFACE GRINDER
Model - ACCUGRIND 300 /400 /450

OKUMA HMC
MA-600 HB



HAAS TURNING CENTRE



HAAS VMC
VF3YT



**Machining of :** Heavy Cast Iron & Steel Components on Turning Center VMC, HMC & Conventional Set up

## MACHINERY AT PHI

- HMC (Okuma) 1000mm X1000mm X 950mm (Twin Pallet) Spindle HSK 100
- HMC (Mitsui Seiki) 800mm X 800mm X 750mm (Twin Pallet)
- VMC (Haas) 1016mm X 660mm X 635mm
- Turning Centre (Haas) Turning dia 530 swing 800
- Balancing Machine (300 dia max weight 50kg) Conventional setup (Lathe, drilling, milling, VTL machine, horizontal grinding, cylindrical grinding etc.)

## MEASURING INSTRUMENTS/ TESTING EQUIPMENTS

- Trimos-1 meter accuracy 1 micron
- Surface Roughness Tester
- Granite Surface Plate (size 1800mm x 1200mm x 200 mm)
- External facility for CMM (3000mm X 1500mm) at B.F.C
- Other measuring instruments like micro meter, vernier caliper, vernier height guage, bore dial guage etc.

# माझी आनंद यात्रा

खूप दिवसांपासून आनंदवन हेमलकसाला जायचे मनात होते. पण प्रत्येक गोष्टीला वेळ यावी लागते हेच खरे! आणि एके दिवशी माझ्या मावस बहीणीचा फोन आला, आम्ही सर्व भावंडे आनंदवन-हेमलकसाला यशोधन टूर्स तर्फे जात आहोत. तु येणार कां? मी लगेचच माझा होकार कळवला. २४ जाने. ते ३१ जाने. १५ ला आमचे जायचे ठरले. २४ ता. ला पुण्याहून गरीबरथने निघालो व २५ ता. ला सकाळी वर्ध्याला पोचलो. तेथून बसने आनंदवनला पोहोचलो. प्रत्येक खोलीत ४ जणांची राहण्याची अगदी उत्तम सोय होती. चहा, नाश्ता करून आनंदवन पहायला बाहेर पडलो. दुसरे दिवशी २६ जाने. असल्याने सर्व बंद होते. खरोखर तिथे डॉ. बाबा आमटे यांनी अपार कष्ट व नावीन्यपूर्ण प्रयोग करून स्वबळावर व कुष्ठरोग्यांच्या मदतीने आनंदवन साकारले आहे. कुष्ठरोग बरा झाला तरी त्या रोग्यांना कोणीही घरी परत घेत नसत, त्यामुळे डॉ. बाबांनी त्यांनी स्वावलंबन शिकवले. त्यांच्या मदतीने तिथे बांधलेली घरे, बागा, मोठी डेअरी, तिथली स्वच्छता बघून आम्ही अगदी थक्क झालो. जेवणानंतर परत आम्ही तिथे हातमागावर तयार होणाऱ्या सतरंज्या, पंचे, चामड्याच्या चप्पल, शिवणकाम, अपंग लोकांनी तयार केलेली विविध प्रकारची ग्रिटींग्ज, एक्स-रे पेपरवर केलेल्या कलाकृती, टाकाऊ वस्तूंपासून केलेल्या शो-पिसेस बघितले. हे सर्व काम करणारी माणसं-कोणाला हाताची बोटे नाहीत. पायाची बोटे नाहीत, चेहरा विद्रूप, तर कोणी अगदी अपंग पण त्यांनी केलेली प्रत्येक वस्तू म्हणजे एक नंबर. खरोखर त्यांच्यापुढे आपण अगदी दुबळे वाटतो. या सर्व लोकांकडे अशक्य हा शब्दच नाही. कुठलेही काम असो ते जीव ओतून करणार. डॉ. बाबा आमटे पुढच्या २ पिढ्याही त्यांचेच हे काम अतिशय आनंदाने व न कंटाळता करत आहेत.







आनंदवनात बाबांचा मुलगा डॉ. विकास त्यांच्या पत्नी डॉ. भारती, त्यांचा मुलगा कौस्तुभ, सून पल्लवी, मुलगी डॉ. शीतल व जावई गौतम हे सर्वजण धुरा सांभाळत आहे. डॉ. बाबा आमटे यांना त्यांच्या पत्नी साधना आमटे यांनीही तेवढीच मोलाची साथ दिली. दुसरे दिवशी २६ जानेवारीला तिथे त्यांनी सुरू केलेल्या शाळेतील अंध, अपंग, मूकबधीर मुलांनी इतके सुंदर कार्यक्रम केले की, आमचे सर्वांचे डोळे अगदी भरून आले. तिथे काम करणाऱ्या प्रत्येक माणसाची, शिक्षकांची कमाल वाटली. कार्यक्रम संपल्यावर तिथे पुस्तके, टॉवेल, चप्पल, टी-शर्ट, झब्बे विक्रीसाठी होते तिथे खरेदी केली व जेवण करून हेमलकसा साठी रवाना झालो. ५/६ तासांचा प्रवास, हेमलकसा म्हणजे लोक बिरादरी प्रकल्प अक्षरश: जंगलात राहून डॉ. प्रकाश व त्यांच्या पत्नी डॉ. मंदा आमटे तिथल्या आदिवासी लोकांच्यासाठी औषध उपचार करतात. आदिवासी त्यांना आता देव मानतात. हा प्रकल्प पण डॉ. बाबा आमटे यांनीच सुरू केलेला आहे. आता डॉ. प्रकाश यांचा मुलगा डॉ. दिगंत व सून डॉ. अनघा हे दोघेही आता पूर्ण वेळ हेमलकसाचा दवाखाना सांभाळतात व त्यांचा दुसरा मुलगा अनिकेत व समीक्षा हे दोघेही प्रकल्पाचे व्यवस्थापन बघतात. प्रथम तिथे काहीच सोयी नव्हत्या. कित्येक वर्ष वीजही नव्हती पण आता अगदी अद्ययावत हॉस्पिटल आहे. सर्व आदिवासींना आमटे कुटुंबियांबाबत खूपच आदर व विश्वास आहे. दवाखाना बघून आम्ही प्राण्यांचं अनाथालय (प्राण्यांचं गोकुळ) बघायला गेलो. २००६ पासून त्याला 'आमटेज आर्क' म्हणतात. इथे माकडं, कुत्रे, बिबट्या, हरणं, अस्वल, मगर, निरनिराळ्या प्रकारचे साप, नाग, ससे यांना श्री. अनिकेत अगदी आपल्या हाताने प्रेमाने खाऊ घालत होते. हेमलकसालाही आदिवासींच्या मुलांसाठी आश्रमशाळा काढलेल्या आहेत. आनंदवन-हेमलकसा, सोमनाथ सर्वांचे एकच वैशिष्ठ्य सर्वांचे जेवण एके ठिकाणी. एकच पाक खाना डॉ. स्वत:ही तेथेच जेवतात. जेवण झाल्यावर प्रत्येकाने आपले ताट-वाटी-भांडे घासून टाकायचे स्वावलंबन! हेमलकसा पाहून बसने सोमनाथ प्रकल्पावर गेलो. ५-६ तासांचा प्रवास. हेमलकसाला एका खोलीत ६ जणांची राहण्याची उत्तम व्यवस्था होती. सोमनाथला एका खोलीत ५ जण. सोमनाथ प्रकल्प डॉ. बाबा आमटे व त्यांचे ज्येष्ठ पुत्र डॉ. विकास यांनी इतका सुंदर उभारला आहे की, त्यामुळे सर्व बऱ्या झालेल्या कुष्ठरोग्यांना डॉ.नी स्वावलंबी बनवले आहे. डॉ. बाबा आमटे म्हणायचे की, कुष्ठरोगी इतके वेदना भोगत असायचे की, वेदनांचा पहाड कोरता कोरता त्यांना कळायचे की, आपण सुखाचे कैवल्यलेणे कोरत आहोत. त्यामुळे डॉ. बाबांचा भर आत्मनिर्भरतेवर होता व त्यासाठी शेती हेच स्वयंपूर्णतेचे व आत्मसन्मानाचे प्रतिक आहे असे त्यांना वाटायचे. म्हणून त्यांनी सरकारकडून शेतीसाठी सोमनाथला जागा मिळवली. तिथे पूर्ण बऱ्या झालेल्या कुष्ठरोग्यांकडून प्रथम विहीरी तलाव खोदून घेतले. प्रथम पाण्याची सोय करून घेतली व नंतर भात, गहू, हळद, तीळ, तूर, पालेभाज्या, फळभाज्या लावल्या. त्यांचा सर्व प्रकल्पांवर वापर करून उरलेला माल बाजारात विकून कुष्ठरोग्यांना फायदा मिळवून दिला. सोमनाथला सिमेंट, वाळू, टायर, प्लॅस्टिक यांचा वापर करून बंधारा बांधून पाणी साठवले. यासाठी डॉ. विकास आमटे यांनी अपार कष्ट घेतले आहेत व नवनवीन योजना आखल्या आहेत. हे सर्व बघून सोमनाथचे दर्शन घेऊन ताडोबाला गेलो परत ६ तासांचा प्रवास. गेल्यावर इडली-सांबार खाऊन खोलीत गेलो. इथे मात्र हॉटेलमध्ये मुक्काम. पण चहाला लॉनवर (हिरवळीवर) टेबल लावली होती. सकाळी ५वा. उठून चहा, बिस्कीट खाऊन जंगल बघायला गेलो. उघड्या जीप एका जीपमध्ये ६ जण. ओळखपत्र दाखवून जंगलात प्रवेश केला.

➤ **पान क्र. २८ वर..**

# गाऊ त्यांची आरती

देशभक्ती, शौर्य, बुद्धिमत्ता, प्रतिभा संपन्नता, उद्योजकता अशा वेगवेगळ्या गुणांनी संपन्न असलेल्या काही कऱ्हाडे ब्राह्मण व्यक्तीमत्वांनी भारताच्या प्रगतीमध्ये व सांस्कृतिक इतिहासात मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या सन्मानार्थ भारत सरकारने पोस्टाची तिकीटे प्रसिद्ध केली. त्यांना आपण वंदन करू या!




झुंजार स्वातंत्र्य सेनानी राणी लक्ष्मीबाई तांबे - नेवलकर
तिकीट प्रसिद्धी दि. १५-८-१९५७







भारतरत्न गोविंद वल्लभ पंत (पराडकर)
तिकीट प्रसिद्धी दि. १०-९-१९६५ व ७-३-१९८८




उद्योजक लक्ष्मणराव किर्लोस्कर
तिकीट प्रसिद्धी दि. २०-६-१९६९




किर्लोस्कर शताब्दी निमित्त
तिकीट प्रसिद्धी दि. २०-६-१९८९




उद्योजक एस. एल. किर्लोस्कर
तिकीट प्रसिद्धी दि. २६-२-२००३




लोकसभेचे सभापती गणेश बी. मावळणकर
तिकीट प्रसिद्धी दि. २७-२-१९८१




बी. व्ही. पराडकर
तिकीट प्रसिद्धी दि. १४-९-१९८४




महाराष्ट्राचे प्रथम मुख्यमंत्री बी. जी. खैर
तिकीट प्रसिद्धी दि. ८-३-१९८९




डॉ. एन. एस. हर्डीकर
तिकीट प्रसिद्धी दि. १३-५-१९८९




ज्येष्ठ साहित्यीक वि. स. खांडेकर
तिकीट प्रसिद्धी दि. १९-१-१९९८

सौजन्य
मा. श्री. अवधुत हर्डीकर,
पुणे

## संस्थावृत्त

## कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळाच्या (डोंबिवली, ठाणे) 'समाजमंदिर' सभागृहाचे नूतनीकरण



कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळाच्या 'समाजमंदिर' सभागृहाचे नूतनीकरण करण्यात आले त्याप्रित्यर्थ वरील शुभदिनी पंचशीर्ष स्थापन पूर्वक वास्तूशांती आणि श्री सत्यनारायण पूजेचे आयोजन करण्यात आले होते.

वास्तूशांती विधीचे यजमानपद संस्थेचे सरकार्यवाह श्री. सुहास पंडित व सौ. स्वाती सु. पंडित यानी स्वीकारले. पुरोहित म्हणून ठाण्याचे श्री. तांबे गुरुजी व त्यांचे सहकारी तसेच संस्थेच्या ब्रह्मवृंद समितीचे सदस्य सर्वश्री प्रदीप रायकर, मनोज चांदोरकर, अविनाश लळीत, सुयोग पाध्ये व अमोल आठल्ये यांनी काम पहिले. वास्तूशांती विधी तळमजल्यावर संपन्न झाला.

श्री सत्यनारायण पूजनास सौ. व श्री. कौस्तुभ मा. कशेळकर या नवविवाहित दांपत्याच्या हस्ते सुरुवात झाली. हा पूजाविधी दु.१.३० वाजेपर्यंत चालला. त्यानंतर आरती, मंत्रपुष्प व नैवेद्य झाला. दोन्ही कार्यक्रमासाठी दांपत्य म्हणून संस्थेचे क्रमांक एकचे सभासद श्री. मधुकर रा. व सौ. सविता म. फणसळकर व दुसरे दांपत्य श्री. अनंत बा. व सौ.मंदा अ. ताटके यांना आमंत्रित करण्यात आले होते.

सुमारे ४०० सभासद, देणगीदार, ठेवीदार, हितचिंतक यांनी 'समाजमंदिराला' भेट दिली व केलेल्या कामाचे कौतुक, प्रशंसा केली. अनेकानी खास अभिप्रायासाठी ठेवलेल्या नोंदवहीत आपली मते नोंदविली.

## कऱ्हाडे ब्राह्मण मुंबई संघाचा ९० वा वर्धापनदिन संपन्न



दिनांक १८ जानेवारी २०१५ रोजी संक्रांत संमेलनाचे औचित्य साधून कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई यांनी आपल्या संघाचा ९० वा वर्धापन दिन सूर्यवंशी क्षत्रिय सभागृह, दादर येथे १०८ दांपत्यांच्या हस्ते सत्यदत्त पूजेचे आयोजन करून साजरा केला.

समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. दाजी पणशीकर व मंत्रघोषात पाहुणे मा. श्री. माधव भांडारी लाभले होते. मंत्रघोषात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते श्री. गणेश पूजन व दीप प्रज्वलन, पाहुण्यांचा गौरव, स्मरणिका प्रकाशन, विवाहास ५० वर्षे पूर्ण झालेल्या दांपत्यांचा सत्कार, विद्यार्थी गौरव, गुणीजन, उद्योजक, पौरोहित्य सत्कार, पाहुण्यांचे मार्गदर्शन व त्यानंतर 'गीत अमृताचे' या भक्तीगीताचा कार्यक्रमाला उपस्थितांची दाद मिळाली.

## माझी आनंद यात्रा

➤ **पान क्र. २६ वरून.**

दोन्ही बाजूला घनदाट जंगल, गार वारा यामुळे स्वेटर घालूनही गारठलो. हरणांचे कळप, गवे व खूप प्रतीक्षेनंतर एक वाघ दिसला ते पाहून हॉटेलवर परतलो. आंघोळ जेवण करून नागपूरसाठी प्रयाण केले. नागपूरच्या अलिकडे हिंगणा तालुक्यात मैत्रबन म्हणून श्री. गंधे यांनी ज्येष्ठांसाठी सुखनिवास प्रकल्प उभारला आहे. तेथे राहणे, जेवणे सर्व व्यवस्था उत्तम आहे. रात्री तिथे मुक्काम करून सकाळी नागपूरला आलो. तिथे प्रथम डॉ. आंबेडकर दीक्षा भवन, डॉ. हेडगेवार, गोळवलकर गुरुजी स्मारक (रेशीमबाग), पवनारला विनोबा भावे यांचा आश्रम, आश्रम बांधताना सापडलेल्या विविध दगडी मूर्ती, पुस्तके, स्वावलंबन पाहून गीताई मंदिर बघायला गेलो. तिथे गीता १८ अध्यायातील प्रत्येक श्लोक दगडावर कोरलेला आहे. अप्रतिम आहे. नंतर सेवाग्राममध्ये महात्मा गांधी, कस्तुरबा गांधी रहात असलेल्या झोपड्या त्यांचे कपडे, भांडी वगैरे बघितले. हे सर्व पाहून बसने परत नागपूर–वर्धा प्रवास केला व वर्ध्याहून ३० ला गरीबरथने पुण्याला परतलो. घरी परतल्यावर पण वाटत होते तिथल्या सारखेच इथे पण प्रत्येकाने आपले आपले काम केले तर सगळेच किती सुखी होतील नाही?

या ट्रीपमधून एकच शिकलो कितीही अडचण आली तरी खचून, घाबरून न जाता प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढायला स्वत:च शिकायचे. देवाने आपल्याला तर सर्व अवयव व्यवस्थित व जागच्या जागी दिले आहेत तर आपण कुठल्याही गोष्टीचा बाऊ न करता पुढे पुढे जात राहिले पाहिजे– सकारात्मक दृष्टिकोन ठेवून.

**– सौ. शुभदा गुर्जर**

# 'आठवणींची लाख फुले'



'आठवणींची लाख फुले', या बकुळीच्या झाडाखाली ... आकाशवाणीवरून हे गीत ऐकताना खरंच, आठवणींची लाख फुले मनात गोळा करीत राहिले आणि फुलांचा दरवळ मनात भरून राहिला. अत्तराची कुपी उघडावी किंवा एखाद्या पालापाचोळ्यातून नेमके सुरेख, सुगंधी फूल शोधावे तसेच झाले. एकाच ओळीतून आणखी काही गाणी आठवू लागली. बालपणी कान व मन समृद्ध, श्रीमंत करणाऱ्या आकाशवाणीवरून विविध गायिकांची गाणी आठवताना स्मरणरंजनाचा आनंद मिळत गेला. 'बकुळफुला कधीची तुला.... धुंडते वनात' हे सुमन नाथ यांनी गायलेलं अथवा 'शब्द शब्द जपून ठेव' हे सुमन कल्याणपूर यांचं गीत असो, लताबाईंनी गायलेल्या आणखी एका गाण्याप्रमाणे 'गुंफिते माळ बकुळफुलांची' अशीच माझी अवस्था होऊ लागली.

माझ्या माहेरी चिपळूणला घराजवळ असलेलं एक मोठ्ठं झाड, त्या झाडाखाली फुलं गोळा करायला जमलेली सर्व छोटी मोठी मुले आणि त्यांची धडपड... सारं आठवायला लागलं. खरंतर आजच्या भाषेत (waste of time) कालापव्यय. पण जास्तीत जास्त फुले वेचून मोठ्ठे गजरे कुणाचे होतात याकडेच दुसऱ्यादिवशी उत्सुकता असे. छोटी पिशवी भरलेली पाहून मोठी मंडळी आमचं कौतुक करतात याचा कोण आनंद!

झाडाकडे नजर लावून (दुर्बिणीप्रमाणे) बसायचं व वारा आला किंवा पक्षाने खाल्लेल्या बकुळ फळातून येणारे (पडणारे) फूल आधी कोण झेलतं यासाठी अहमहमिकाच असे. आमची 'काकदृष्टी' आणखीच विस्तारायची.

जिला फूल मिळे ती जणू जग जिंकल्याच्या आविर्भावात असायची. पण किंचितसा हेवा, मत्सर वाटला तरी सारं काही खेळीमेळीने होई. एखादीला अगदीच थोडी मिळाली तर आपल्यातील २-४ फुले तिला घरी जाताना आम्ही देऊन एक समाधान मिळवून घरी परतायचो. सागरगोटे खेळताना जी एकाग्रता व समन्वय लागतो तिचाच उपयोग फुले गोळा करताना होतो असं आता वाटतं.

आजच्यासारखा ताणतणाव नसल्याने फुले वेचणे या प्रकारात आमचा खूप छान वेळ जाई. अभ्यास करून गेल्याने कोणालाही ओरडावे लागलं नाही. जानेवारीच्या थंडीच्या दिवसात बकुळीचे दुहेरी, तिहेरी, गजरे एका ताटलीत ठेवून बैठ्या घराच्या पत्र्यावर ठेवले की, दुसऱ्या दिवशी अगदी टवटवीत दिसायचे. रात्री पडलेल्या दवामुळे (फ्रीज नसूनही) ते तजेलदार गजरे फार सुरेख दिसत. तो ताजेपणाचा अनुभव अजूनही तितकाच ताजा आहे.

याच दरम्यान महाशिवरात्रीला आमच्या कृष्णेश्वराचा उत्सव असतो. त्यामुळे मुंबई-पुण्याची पाहुणे मंडळी आली की, त्यांना आधी हौसेने गजरे द्यायचे, मग उरले तर आपण, अशीच आमची भूमिका असे. त्यांचा आनंद जणू आमचाही आनंद होऊन जाई. सर्व मंडळींना ते गंध भारलेले झाड पाहताना फार बरे वाटे. उत्सव करून परतणारी मंडळी बकुळफुलांचा गंधही बरोबर नेत असावीत हे आज आता माझं लग्न झाल्यावर मला जाणवतं. वाळलेली फुले सुद्धा सुगंध देतात म्हणूनच कपड्यामध्ये वाळलेले गजरे ठेवणार असं सांगणारी मंडळीही मला अजून आठवतात.

मी सुद्धा पुण्याला आल्यावर बकुळफुलांच्या आठवणीने बेचैन होई. सुरुवातीच्या माझ्या बघण्यात पुण्यामध्ये मंडईतच फुले/गजरे आहेत असं होतं. पण ६/८ महिन्यात लगेच कळलं की, शनिवार पेठेत न. वि. गाडगीळ शाळेच्या आवारात बकुळीचं झाड आहे. मला फार आनंद झाला. तेव्हांपासून ही फुलं इथेही वेचते. ज्या ज्या मंडळींना आवडतात त्यांनाही देत असते आणि तेव्हां इतका वेळ देऊ शकले नाही तरी थोड्याशा फुलांचा छोटा गजरा देतांना मीच जणू भाव खाऊन जाते.

बेधुंद करणारा, हवाहवासा वाटणारा मोगरा, शांत वाटणारी व नेत्रसुखद रंगांची अबोली, नाजूक आणि धुंद दरवळ असलेली सायली, मदनबाण यांच्याप्रमाणे धुंदफुंद करणारी बकुळ नसली तरीही स्वत:चा रंग, मादक गंध आणि सात्विक धुंदीचं प्रतीक असलेली ही बकुळफुलं आहेत. घराशेजारीच मिळणाऱ्या या फुलांचा गंध ओंजळीत भरला गेला की, जणू माहेर पुन्हा भेटतं, 'बालपणीचा काळ सुखाचा' असा प्रत्ययही देतं, नित्यनूतन सुगंध देत, आठवणी जागवतं आणि मनात येतं, ...

उमलतात बकुळफुले
गंधभारल्या मनी
जागविती आठवणी, जागविती आठवणी।।

**डॉ. सौ. राजश्री गजानन महाजनी**
**मो. ९४०४२२७२१०**

## चारोळ्या

*** शब्दांतून व्यक्त होणं**
**मला जमत नाही**
**म्हणूनच तुझ्या-माझ्या नात्याला**
**कांही नांव सुचत नाही**

*** कोण्या एका क्षणी**
**तू माझं मन हिरावलंस**
**असं कसं रे क्षणातच**
**ते माझं मला दुरावलं!**

*** हवेत आहे श्वास तुझा**
**कवेत माझ्या भास तुझा**
**हिऱ्या माणकांचा नव्हे**
**जीवना आहे ध्यास तुझा**

*** सुगंधी जखमांना चाळू नकोस**
**वैभवास माझ्या न्याहाळू नकोस**
**करती घात ही स्वप्ने दिनरात**
**त्यांच्यात मला तू सांभाळू नकोस**



संस्थावृत्त

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे येथे तिळगूळ समारंभ संपन्न

कऱ्हाडे ब्राह्मण संघ पुणेचा तिळगूळ समारंभ पुणे येथे आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये संघाच्या ज्या सभासदांनी त्यांच्या वयाची ७५ वर्षे पूर्ण केली आहेत; अशा १५ सभासदांचा सन्मानपत्र, पुष्प आणि श्रीफळ देऊन सत्कार संस्थेचे दोन ज्येष्ठ माजी पदाधिकारी मा. श्री. चारूदत्त सरपोतदार आणि मा. श्री. वसंतराव नूलकर यांच्या हस्ते करण्यात आला. त्यानंतर ज्या विद्यार्थी /विद्यार्थिनींनी इ. १०वी, इ.१२ वी व पदव्युत्तर अभ्यासक्रमात ज्यांनी ६० % पेक्षा जास्त गुण मिळवले आहेत, अशांना अनुक्रमे रू. ३०००/– रू.५०००/– रू. १०,०००/– अशा स्वरूपांत पुरस्कार देवून सर्व विद्यार्थी /विद्यार्थ्यींनींचे कौतुक करण्यात आले. या प्रसंगी अध्यक्ष श्री. गणेश गुर्जर यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला, आणि असेही नमूद केले की ज्येष्ठ सभासदांशी संवाद साधून त्यांनी सत्कार समारंभास उपस्थित रहावे त्यावेळी ''वयाची ७५ री गाठली यांत काय विशेष म्हणून आम्ही येणार नाही. '' यास उत्तर देतांना मा. अध्यक्षांनी सांगितले की हा सत्कार म्हणजे वयाची ७५ गाठली म्हणून नाहीतर या ७५ वर्षांच्या काळात दोन पिढ्यांना संस्कार दिले म्हणून आहे. जर सभासदांना असे वाटत असेल की ७५ वर्ष पूर्ण झाल्याबद्दल सत्कार असे नामकरण नको असेल तर आपण त्याला ''आशिषग्रहण समारोह'' असे नांव पुढील वर्षापासून ठेवू त्यांस उपस्थितांनी संमती दर्शवली. संघाचे ज्येष्ठ व संस्थापक सभासद मा. श्री. वसंतराव नूलकर यांनी संघाच्या स्थापनेसाठी तसेच त्याच्या वाढीसाठी मा. श्री. चारूदत्त सरपोतदार मा. कै.कमलाकर श्रीखंडे, मा. श्री. अरविंद नवरे, मा. कै. अ.गो. शेवडे यांनी घेतलेल्या परिश्रमाचे कौतुक करून सध्याच्या कार्यकारणीनेही संघ कार्यात उत्तम मेहनत घेतली आहे. संघाने आणखी एक जबाबदारी स्वीकारून अत्यंत यशस्वीपणे पार पाडत आहेत. ती म्हणजे महासंघाचे त्रैमासिक ''संपर्क'' यानंतर सौ. मृदुला मोघे आणि दिलीप हल्याळ यांनी ''हास्य षटकार'' हा दैनंदिन जीवनावरील प्रसंगावर आधारित कार्यक्रम सादर केला.

डॉ. सौ. राजश्री ग.महाजनी यांनी पसायदान सादर केले. तत्पूर्वी श्री. गोपाळ भाटवडेकर यांनी आभारप्रदर्शन केले.

**विभागवार मेळावा**

दि. ४.१.२०१५ रविवारी सिंहगड रोडवरील ''नित्यानंद'' हॉलमध्ये सिंहगड परिसरात राहणाऱ्या कऱ्हाडे जातीतील बंधूभगिनींसाठी विभागवार मेळाव्याचे आयोजन केले होते. या मेळाव्यास पंचवीस ज्ञातीबांधव उपस्थित होते. यावेळी मा. अध्यक्ष श्री. गणेश गुर्जर यांनी प्रास्ताविक केले आणि मा. उपाध्यक्ष श्री. गोपाळ भाटवडेकर, मा. मकरंद फणसळकर, खजिनदार व मा. श्री. लक्ष्मीकांत देसाई कार्यवाह यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली आणि उपस्थित सभासदांनी संघाकडून काय अपेक्षा आहेत सभासदसंख्येत वाढ होण्यासाठी काय मदत मिळेल? असे विविध प्रश्न विचारत मेळाव्यात सहभागी झाले. पदाधिकाऱ्यांनी उपस्थित सभासदांना आश्वस्त केले की, जेव्हा जेव्हा संघाकडून काही सहकार्याची आवश्यकता वाटेल त्या वेळी ती नक्कीच उपलब्ध होईल. चहा आणि नाश्त्यानंतर श्री. हेमंत पुराणिक या कार्यक्रमाचे संयोजक यांनी उपस्थितांचे प्रति आभार व्यक्त केले. आणि मेळावा संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**रक्तदान शिबिर–**

रविवार दि. ११.१.२०१५ रोजी सकाळी ९.३० वाजता संस्थेच्या कार्यालयाच्या पार्कींगमध्ये कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात विश्वस्त मंडळाचे सर्व विश्वस्त उपस्थित होते. एकूण १५ जणांनी रक्तदान केले. सर्व रक्तदान करणाऱ्यांना रक्तपेढीतर्फे प्रशस्तीपत्र देण्यात आले. चहा नाश्ता झाल्यानंतर संयोजक श्री. हेमंत पुराणिक यांनी रक्तपेढीचे आणि रक्तदात्यांचे प्रति कृतज्ञता व्यक्त करून सामाजिक उपक्रम संपन्न झाल्याचे जाहीर केले.

# कऱ्हाडे ब्राहमण संघ, बेळगाव येथे महिला दिन साजरा

बेळगाव : कऱ्हाडे ब्राहमण संघाच्या मिळून साऱ्याजणी यांच्यावतीने महिला दिन हेरवाडकर शाळेच्या सभागृहात साजरा करण्यात आला. प्रारंभी मानसी बोंद्रे व सुलभा हेर्लेकर यांनी स्वागतगीत सादर केले. यानंतर गुणी महिला व मुले – मुली यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी मराठी कन्नड समूहगीत गायन, भरतनाट्यम्, रुपक नाट्यछटा, गोंधळ असे सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. यामध्ये रुपा बोंद्रे, भारती भट्, सुचित्रा बोंद्रे, मंगला कानेटकर, मधुगंधा आंबिलकर, शर्वरी साधले, आराधना बोंद्रे, सुषमा पुराणिक, शितल पित्रे, गौरी देव, वृषाली चाफळकर, चित्रा व रुपा कानेटकर, सुमती हर्डीकर, चंद्रकला व रक्षा देवभक्त, इंचरा भट, स्नेहल देऊळकर, सुस्मिता हेर्लेकर, स्नेहल धामणकर, वृषाली बोंद्रे, प्रसन्ना भट, वर्षा सप्रे, शलाका मणेरीकर, रजनी गुर्जर, वेदवती हेर्लेकर, उषा व श्रद्धा भट, दाक्षायणी देव यांनी भाग घेतला होता. समुहगीताला नंदन हेर्लेकर व यशवंत बोंद्रे यांनी तबला पेटीची साथ दिली. डी. सी. पी. यांनी महासंघाच्या या वर्षी होणाऱ्या रौप्य महोत्सवाविषयी माहिती दिली. तसेच संपर्क ची वर्गणी पाच वर्षांसाठी ५०० रु. केली आहे. ज्यांना तशी द्यायची असेल त्यांनी ५०० रु. द्यावेत व जाहिरातीही द्याव्यात असे सांगितले.

सूत्रसंचालन हेमा बोंद्रे व भारती भट यांनी केले. अध्यक्ष शिरीष कानेटकर व उपाध्यक्ष सीताकांत जोशी यांनी महिलांना स्मृतिचिन्ह देऊन गौरविले. आराधना बोंद्रे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचा समारोप पसायदान व स्नेहभोजन झाला.



इस्लामपूर, बारामती सोलापूरच्या यशस्वी दौऱ्यानंतर आत्ता
२२ मार्च नाशिक, २३ सटाणा, २४ मालेगांव, २५ सिन्नर
संगीतमय हास्य-अभिनयाचा
उत्तुंग आविष्कार!!
हास्य चटकार
द्विपात्री
हास्यकलाकृती
आत्ता
नवीन स्वरूपात
सादरकर्ते : सारेगमप फेम मृदुला मोघे आणि विनोदवीर दिलीप हल्याळ
शो संपर्क : 9422008889 मनोरंजन : 9822603880

## पत्र प्रतिसाद

Date : 2/2/2015.

स. न. वि. वि.

संपर्कचा जाने. 2015 चा अंक वाचला. अंक अप्रतिमच आहे. कुठल्याही मासिकाच्या तोडीस तोड आहे. पुरस्कारार्थ 26 जाने. चे संचालन [illegible] आपण, जे औचित्य दाखवले आहे, त्यासही कौतुक कामाचे करायलाच पाहिजे.

आपल्या मासिकाच्या सभासदांनी आपापली काही साहित्याची निवड केलीस का, ते मासिकात संपर्क मधून विचाराधार करता येईल.

संपर्कच्या 'सुंदर व देखणेपणा' साठी आपण जे कष्ट घेत आहात, त्यासाठी आपल्याला खरोखर हवे धन्यवाद करावे लागतील.

कळावे.

आपला

सी. पी. जोशी


# फणसळकर कोंकण काजू



कोकण काजू सांडगी मिरची

फणस–तळलेले गरे काजूकतली

उत्पादक :

**प्रा. सौ. मृणालिनी विजय फणसळकर**

मु. पो. – आंगले, ता. राजापूर, जि. रत्नागिरी

फोन. : ९४२२२९६५५३, ०२३५३–६५६२५१

**WITH BEST COMPLIMENTS FROM**

# मे. डी.व्ही. भाटवडेकर क्लॉथ मर्चंटस्

फोन नं. – २४४५६०४७

६४०, नारायण पेठ, न. चिं. केळकर रस्ता,

नू. म. वि. मराठी शाळेसमोर, पुणे ४११ ०३०,

**कॉटन, टेरिकॉट, शर्टिंग, सुटिंग, लाँग क्लॉथ, पॉपलीन सोलापूर चादरी बेडशीटस्, टॉवेल्स, रेडीमेड पायजमे बंडी – कुडते – बर्म्युडा – ३/४ पँटस्**

अधिकृत विक्रेते

युनायटेड होजिअरी – कॅप्टन होजिअरी

# निकेत फोटोज्

**कर्वेनगर शाखा**

**सौ. नेहा सप्रे – ९८५०८८४९४५**


| | |
|---|---|
| पोर्ट फोलिओ | स्कॅनिंग |
| स्टुडिओ फोटोज् | व्ही.एच.एस. / डीव्ही कॅसेटची सीडी |
| पासपोर्ट फोटोज् | कॅमेरा रिपेअरिंग |
| रोल्स डेव्हलपिंग/प्रिंटींग | टेबल टॉप्स |
| लॅमिनेशन | इंडस्ट्रिअल फोटोग्राफी / व्हिडीओ शूटींग |
| डिजीटल मिक्सिंग फोटोज् | सर्व प्रकारच्या लहान मोठ्या कार्यक्रमांचे |
| कोलाज् | फोटो आणि व्हिडीओ शूटींग |

*** अपंग किंवा दुर्धर आजारी लोकांसाठी घरी येऊन फोटो काढण्याची सुविधा**



आपला मुलगा/मुलगी
देशाबाहेर आहे का ?
**इंटरनेट** वरून
त्यांना संपर्क करताना
त्रास होतो ?

आम्हाला कॉल करा
आम्ही आपला त्रास
स्वस्त दरात कमी करू.



**SDS ENTERPRISES**

**Sales**
- Desktop
  - a. Branded
  - b. Assembled
- Laptops
- Tables
- Printers
- Accessories

**Repairs**
- Desktop
- Laptop
- Accessories

**Solutions**
- On Internet
- Network
- Web
- Annual Maintenance
  - a. Desktop
  - b. Laptops
  - c. Network
  - d. Printers

संपर्क
**Shantanu Gurjar**
**9890990112**
**9326209282**
shantanu@sdsenterprises.net

# इन्शुरन्स स्पेशालिस्ट

सुरक्षित करा आपले भवितव्य



सर्व प्रकारच्या विमा योजना
एकाच ठिकाणी उपलब्ध.

१) जीवन विमा
२) आरोग्य विमा (मेडिक्लेम)
३) वाहन विमा
४) अपघात विमा
५) प्रवासी विमा
६) मालमत्ता (प्रॉपर्टी) विमा
७) संस्थेचा विमा
८) सागरी (मरिन) विमा
९) सामुदायिक विमा(ग्रुप इंन्शुरन्स)
१०) अनिवासी भारतीय विमा



**मंगेश जांभेकर**

मोबाईल : ९८१९७ ५०९५५

Email : mangesh.jambhekar@gmail.com

Office Add.: Cabin No. 2, Prime Space Business Centre, So Lucky HSG. Society
M. G. Road, Above Sunder Hotel, Vile Parle East, Mumbai 400057





# सुयश कॅटरर्स

१९७२ पासूनची स्वादिष्ट परंपरा

आपुलकीने सेवा देणारी माणसं

माऊली हॉल
मिनी माऊली हॉल
सर्वेश हॉल
मंगलमूर्ती सभागृह
ब्राम्हणसभा (पंडितवाडी) कल्याण.



सुहास व स्वाती पंडित
यांचे भ्रमणध्वनी
९८३३३०४०३३
९८३३०४२७३३

अन्य संपर्क
सौ. गौरी सरपोतदार-९९३०८८६०४८
योगेश कानेटकर-९८१९०३९३५९

**संपूर्ण व्यवस्थापन**

सिटी मॉल, पेंढारकर कॉलेज जवळ, एम.आय.डी.सी., डोंबिवली (पूर्व)

## न्यूजपेपर फॉर इंडिया, नवी दिल्ली यांचे नियमानुसार फॉर्म ४
## वृत्तपत्राच्या मालकीहक्कासंबंधीचे निवेदन

| | |
|---|---|
| १) मासिकाचे नाव | : भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे संपर्क **(RNI NO. MAHAMAR/2013/51438 )** |
| २) प्रकाशन स्थळ (पूर्ण पत्ता) | : ४३७, नारायण पेठ, 'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ, पुणे – ४११ ०३०. |
| ३) प्रकाशन काल | : त्रैमासिक |
| ४) मुद्रकाचे नाव | : गोपाळ भाटवडेकर |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : ४३७, नारायण पेठ, 'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ, पुणे – ४११ ०३०. |
| ५) प्रकाशकाचे नाव | : श्री. गोपाळ भाटवडेकर |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : ४३७, नारायण पेठ, 'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ, पुणे – ४११ ०३०. |
| ६) संपादक | : गणेश गुर्जर |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : ४३७, नारायण पेठ, 'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ, पुणे – ४११ ०३०. |
| ७) मुद्रण स्थळ (पूर्ण पत्ता) | : एकविरा प्रकाशन, कर्वेनगर, पुणे ४११०५२. |
| ८) वृत्तपत्राची मालकी हक्क/ | : भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ |
| स्वामित्व इ. चे नाव व कार्यालयाचा पत्ता | : ४३७, नारायण पेठ, 'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ, पुणे – ४११ ०३०. |

मी गोपाळ भाटवडेकर घोषित करतो की वरील तपशील माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे विश्वासपात्र व सत्य आहे

दिनांक : ०१/०३/२०१५ प्रकाशक : गोपाळ भाटवडेकर



**ऋणानुबंध घराण्यांचे, संस्कार पिढ्यान् पिढ्यांचे**

(व्यवस्थापन)

**श्री अन्नपूर्णा केटरर्स**



(समर्थ डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांच्या मालकीचे)

**श्रुति मंगल कार्यालय**



आमचे मार्गदर्शक व आमचे सद्गुरू

**।।श्री दिगंबरदास महाराज।।**

यांच्या आशिर्वादाने श्रुति मंगल कार्यालयानं मंगल कार्याची परंपरा निर्माण केली व जपली आहे. विवाह, मौंजीबंधन अथवा कोणताही समारंभ या सर्वांतून दृग्गोचर होते घराणे व सुसंस्कृतपणा हा समारंभ संपन्न करणाऱ्या परिवारांचा. अशा साजऱ्या होणाऱ्या समारंभासाठी सुयोग्य वास्तू उपलब्ध करून देणे जिला असेल पावित्र्य मंदिराचे, जेवण असेल अन्नपूर्णेचे, सौंदर्य असेल वास्तूरचनेचे, सुख असेल आधुनिकतेचे हेच श्रुति मंगल कार्यालयाचे 'ध्येय'. बाकी कार्य सिद्धीस नेण्यास श्री समर्थ आहेतच.

**मंगल कार्यासाठी दोन स्वतंत्र हॉल**

**दुर्गा हॉल** : पहिला मजला – ३६०० चौ. फुट
वधू–वर पक्षासाठी प्रत्येकी २ खोल्या

**जानकी हॉल** : दुसरा मजला – ३६०० चौ. फुट
वधू–वर पक्षासाठी प्रत्येकी २ खोल्या (टेरेस १००० चौ. फुट)
सर्व खोल्या सेल्फ कन्टेन्ड, प्रशस्त पार्किंग, हवेशीर, भरपूर उजेड, मध्यवर्ती, उत्कृष्ट भोजन, उत्तम वाढप व्यवस्था, लिफ्टची सुविधा, शिवाय दोन मोठे जिने हे सर्व अत्यंत वाजवी दरात

**श्री अन्नपूर्णा केटरर्स**
श्री. प्रभाकर र. काजरेकर
**श्रुति मंगल कार्यालय**

१२३६, आपटे रस्ता, डेक्कन जिमखाना, पुणे – ४११ ००४
दूरध्वनी : ०२०–२५५३१७४९, २५५२१४४० फॅक्स : ०२०–२५५२१९९८
Website : www.shrutimangal.com E-mail : hrishikesh@shrutimangal.com

## WITH BEST COMPLIMENT FROM:

### J.P.F METACAST PVT LTD

PLOT NO. 7, 16, 29 MACCHE INDUSTRIAL ESTATE
BELGAUM - 590014 KARNATAKA, INDIA
Ph: 0831-2440664 Fax : 0831-2441069
E-mail : admin@jpfmetacast.com
www.jpfmetacast.com

TÜV
SÜD
ISO 9001

***Manufacturers of all types of Cast iron and Ductile Iron castings***

- An ISO 9001 : 2008 certified company
- Winner of National Quality Award in SSI - 1998
- Winner of Rajeev Gandhi National Quality Award - 2007
- Winner of Jayaswal Neco Best Quality award from Institute of Indian Foundrymen - 2012
- Winner for Best Operations Management from S.P.Jain Institute of Management and Research, Mumbai 2014

**Industries Served :** Diesel Engines, Tractors, Compressors, Road construction Machineries, Machine Tools ,etc

